


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १५१ * नांदेड * शनिवार, दि. ७ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल, संकेत नाही आता बातमीच देणार -उद्धव ठाकरे



**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राच्या मनात जे आहे ते होणार, आता संकेत देणार नाही, थोड्या दिवसात बातमीच देतो असं थेट वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं. आपल्या शिवसैनिकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही, त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मनातही कोणताच संभ्रम नाही असंही उद्धव ठाकरे म्हणाले. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरेंच्या युतीवर दोन्ही नेते सकारात्मक असल्याचे संकेत मिळत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात शिवसेना ठाकरे आणि मनसेच्या युतीची चर्चा सुरू आहे. परंतु अद्याप तसा कोणताही प्रस्ताव आपल्याकडे आला नाही, युतीची चर्चा ही कॅमेरासमोर होत नाही असं मनसेच्या नेत्यांनी स्पष्ट केलं होतं. तसेच या आधी २०१४ आणि २०१७ साली अशीच चर्चा झाली होती, त्यामुळे आता ताकही फुंकून प्यावं लागत असल्याचं मनसेनेच्या नेत्यांनी म्हटलं होतं.

मनसेच्या या प्रतिक्रियावर उद्धव ठाकरेंनी वक्तव्य केलं. महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात जे काही आहे ते होणारच असे उद्धव ठाकरे म्हणाले. युतीच्या चर्चांवर आता कोणतेही संकेत देणार नाही, थेट बातमीच देतो असंही ते म्हणाले. युतीसंबंधी जे बारकावे असतील त्यावर आम्ही काय करायचे ते पाहू असंही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं. उद्धव ठाकरेंचे हे वक्तव्य म्हणजे शिवसेना-मनसे युतीकडे पडलेलं पुढचं पाऊल असल्याची चर्चा आहे.

मनसेचे नेते अविनाश देशपांडे म्हणाले की, ज्यावेळी आमच्याकडे युतीचा ठोस प्रस्ताव येईल त्यावेळी त्यावर राज ठाकरे निर्णय घेतील. उद्धव ठाकरे म्हणाले की महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात जे काही आहे ते होईल. परंतु महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात २०१४ आणि २०१७ सालीही काहीतरी होतं. पण उद्धव ठाकरेंच्या मनात नव्हतं. त्यामुळे जनतेच्या मनात काहीही असो, उद्धव ठाकरेंच्या मनात काय आहे ते महत्त्वाचं.

उद्धव ठाकरे म्हणाले की, ते बातमी देणार. त्यामुळे ते काय बातमी देणार याची वाट पाहू असं संदीप देशपांडे म्हणाले.

उद्धव ठाकरेंना त्यांचे सहकारी फसवतात. वैभव दवळीला त्यांनी प्रवेश दिला.पण तो मनसेचा पदाधिकारी नव्हता. २०१४ सालीच त्याची आम्ही हकालपट्टी केली होती. तो आमचा कार्यकर्ता नाही असं संदीप देशपांडे यांनी स्पष्ट केलं.

## चेंगराचेंगरी प्रकरणी विराट कोहलीवरही गुन्हा दाखल

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** बंगळुरूमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयी परेड दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणात स्टार खेळाडू विराट कोहली विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता.

याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते एच.एम. वेंकटेश यांनी क्रिकेटपटू विराट कोहलीविरुद्ध बेंगळुरूमधील क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात आधीच गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे. त्याच प्रकरणाच्या चौकशीत वेंकटेश यांची तक्रार समाविष्ट केली जाईल.

बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिसांनी आज, शुक्रवारी रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरूचे (आरसीबी) मार्केटिंग प्रमुख निखिल सोसाळे याच्यासह अन्य तिघांना अटक केली. ते इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए नेटवर्क्सशी संबंधित आहेत.

## नांदेड जिल्हा परिषदेत शिवस्वराज्य दिन उत्साहात

### शिवस्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीला नवचैतन्य देणारी -पालकमंत्री अतुल सावे



**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी स्वराज्याच्या प्रेरणेचा स्मृतीदिन म्हणजे शिवस्वराज्य दिन नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. शिवस्वराज्य दिन हे नव्या पिढीला प्रेरणा व नवचैतन्य देणारे स्मरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक करून स्वराज्याची स्थापना केली. महाराष्ट्र शासनाने २०२१ पासून हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे, असे राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा पालकमंत्री अतुल सावे यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशात सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन भगव्या ध्वजासह स्वराज्य गुढी उभारण्यात आली, शिवशक राजदंड व गुढीचे पूजनही करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी पालकमंत्री अतुल सावे यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखवला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेला सुशासनाचा आदर्श आजही प्रशासकीय कार्यपद्धतीसाठी दिशादर्शक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या लोककल्याणकारी धोरणांचा आदर्श घेत जिल्हा परिषद ग्रामीण विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलत आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हा परिषद प्रांगणात उभारलेल्या दोन गाळ्यांची चावी तिरंगा महिला प्रभाग संघाकडे सुपूर्द करण्यात आली. या गाळ्यांमध्ये महिला बचत गटांची उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात येणार असून दुसऱ्या गाळ्यात कॅंटीन चालवले जाणार आहे. शाहीर रमेश गिरी व त्यांच्या संचाने शिवचरित्रावर आधारित पोवाडा व गीत सादर करून वातावरण शिवमय केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन पद्माकर कुलकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले.

या कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, शिक्षणाधिकारी माधव सलगर, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ विचारवंत दाजी पणशीकर यांचे निधन



**मुंबई (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ विचारवंत, लेखक आणि व्याख्याते दाजी पणशीकर यांचे शुक्रवार, ६ जून रोजी संध्याकाळी ठाण्यातील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन कन्या, मुलगा, सून व जावई असा परिवार आहे.

रामायण व महाभारत यांचे गाढे अभ्यासक आणि संतवाङ्मयाचे व्यासंगी असलेल्या पणशीकरांनी गेली पाच दशके समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, ७ जून रोजी सकाळी ९.३० वाजता ठाणे पश्चिम येथील जवाहर बाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या आजोबा वासुदेवशास्त्री पणशीकर यांच्याकडून मिळालेला हिंदू धर्मग्रंथांचा आणि परंपरांचा वारसा त्यांनी अभ्यासपूर्वक पुढे नेला.

## ट्रक-मोटारसायकलच्या अपघातात आईचा जागीच मृत्यू

### मुलगा व नातू गंभीर जखमी

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** चिटमोगरा ता. बिलोली येथील आई, मुलगा आणि नातू हे शंकरनगर येथून गावाकडे मोटारसायकलवर जात असताना नांदेड-देगलूर राज्य महामार्गावर शंकरनगरपासून जवळच असलेल्या नायरा पेट्रोल पंपाजवळ झालेल्या ट्रक व मोटरसायकलच्या भीषण अपघातात आईचा मृत्यू झाला आहे. तर तिचा मुलगा व पाच वर्षांचा चिमुकला नातू हे दोघेही गंभीर जखमी झाल्याची घटना दि. ५ जून रोजी दुपारी घडली.

चिटमोगरा ता. बिलोली येथील मारुती देविदास पेंटे यांचा पाच वर्षांचा चिमुकला बालक गणेश यांना दवाखान्यात दाखवण्यासाठी म्हणून त्यांना घेऊन फुलबाई देविदास पेंटे (वय ५०), माधव देविदास पेंटे (वय २७) शंकरनगरला सकाळी जाऊन गणेशला दवाखान्यात दाखविले. त्यानंतर तेथून शंकरनगरकडे परत आपल्या मोटरसायकलवरून गावाकडे जाण्यासाठी निघाले असता ते शंकरनगरपासून जवळच असलेल्या नायरा पेट्रोल पंपाजवळ देगलूरकडून नांदेडकडे येणाऱ्या भरधाव वेगातील आयचर ट्रक क्रमांक एम.एच. २८ बी ८०९१ या ट्रकने मोटार सायकलला धडक दिली. झालेल्या या भीषण अपघातात मोटार सायकलवर असलेल्या फुलबाई देविदास पेंटे यांचा जागीच मृत्यू झाला. तर अपघातात मुलगा माधव देविदास पेंटे आणि पाच वर्षांचा चिमुकला नातू बालक गणेश मारुती पेंटे हे गंभीर जखमी झाले आहेत.



**नांदेड :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त सकल मराठा समाजाच्यावतीने शिवस्मारक येथे दुग्ध अभिषेक करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा शल्य चिकीत्सक निळकंठ भोसीकर यांच्यासह सकल मराठा समाजातील पदाधिकारी उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## नांदेड जिल्ह्यासाठी दोन दिवस येलो अलर्ट; वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी ६ जून २०२५ रोजी दुपारी १२:४६ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी ८ व ९ जून २०२५ या तीन दिवसासाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे.

या दरम्यान जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाऊनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

## सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी करणाऱ्या हदगावच्या सह दुय्यम निबंधकास निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी केल्याप्रकरणी हदगाव तालुक्याच्या सह दुय्यम निबंधक आर.सी. सेवलीकर यांना निलंबित करण्यात आले आहे.

शेख जाकीर शेख समीर, यांच्या दि. १४ मे २०२५ रोजीच्या तक्रार अर्जातील नमुद दस्त क. १९५४/२०२५, १९५५/२०२५, १९५६/२०२५, १९६३/२०२५ व १९६५/२०२५ या दस्तांची पडताळणी केली असता सदरचे सर्व दस्तऐवज नोंदणीस स्विकारल्याचा, नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ३४ अन्वये कबुलीजबाब घेतल्याचा दिनांक/वेळ आणि कलम ६० अन्वये संगणकीय प्रणालीवर प्रमाणपत्र (नोंदणी पूर्ण शिका क्र.०५ त्याच दिवशी न करता) दिल्याचा दिनांक व वेळ यामध्ये तफावत आढळुन आली आहे. त्यामुळे नोंदणी अधिनियम १९०८ अन्वये दस्त नोंदणीची प्रक्रिया व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाचे परिपत्रक क्र. का.३/संगणकीकृत नोंदणी प्रक्रिया/१९ दि. २९/०१/२००३ चा भंग करुन दस्त नोंदणी करीत असल्याचे दिसून आले आहे. आर.सी. सेवलीकर, दुय्यम निबंधक श्रेणी-१, यांचेविरुद्ध उपरोक्त अनियमिततेच्या अनुषंगाने शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली आहे.

सेवलीकर यांनी केलेल्या कृतीमुळे सह दुय्यम निबंधक कार्यालय हदगाव कार्यालयाची तथा नोंदणी विभागाची प्रतिमा मलीन झाली आहे. सदरची कृती अत्यंत गंभीर स्वरुपाची शासकीय कर्मचाऱ्याला अशोभनीय ठरेल अशी कृती असल्याने त्यांना शासन सेवेत कार्यरत ठेवणे कार्यालयीन शिस्तीवर प्रतिकुल परिणाम करणारे व शासन हितास्तव उचित होणार नाही.

सेवलीकर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ४ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या कालावधीत आर.सी. सेवलीकर, दुय्यम निबंधक श्रेणी-१, यांचे मुख्यालय प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई हे राहील. त्यांनी अपर मुद्रांक नियंत्रक मुंबई यांची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडु नये त्याचप्रमाणे त्यांना निलंबन कालावधीच्या काळात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणतीही नोकरी स्विकारता येणार नाही, असे निलंबन आदेशात नमूद केले आहे.

## हायवाच्या धडकेत एकाचा जागीच मृत्यू

**बिलोली (प्रतिनिधी)–** रेतीची वाहतूक करणाऱ्या एका दहा टायरी हायवा वाहनाने स्कुटीवरून जाणाऱ्या एकास जोराची धडक दिली. या धडकेत स्कुटीवरील वरून जाणाऱ्या किशनराव वाघमारे यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.६ जून रोजी दुपारच्या सुमारास बिलोली शहरातील नवीन पंचायत समिती कार्यालयासमोर घडली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बिलोली तालुक्यातील विविध गावातील रेती घाटावरून मांजरा नदी पात्रातील लाल रेतीचे उत्खनन व वाहतूक करण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे दि.६ जून रोजी रेती घाटावरून रेती भरून जाणाऱ्या एम.एच. १२ यू. एन. ००३२ क्रमांकाच्या दहा टायरी हायवा वाहन चालकाने बिलोली तालुक्यातील बेळकोणी येथील रहिवासी किशन रामा वाघमारे यांच्या दुचाकी स्कुटीस जोराची धडक दिली. या जबर धडकेत वाघमारे यांच्या डोक्यावरून रेतीने भरलेली गाडी गेली. या अपघातात त्यांच्या डोक्याचा पुर्ण चेंदामेंदा होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बिलोली पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बिलोली ग्रामीण रूग्णालयात पाठवण्यात आला. अपघातास कारणीभूत असलेला हायवा पोलिसांनी ताब्यात घेतली असून वृत्त लिहेपर्यंत बिलोली पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सायबर फसवणुकीवर नवा उपाय

आपल्या देशातील पोलीस यंत्रणा कोणासाठी राबते हे सगळ्यांना माहीत आहे. सामान्य लोकांची कामं किती वेगाने होतात हे वेगळं सांगण्याची गरज नाही. त्यातल्या त्यात आर्थिक फसवणुकीचं प्रकरण असल्यास सामान्याचे हाल कुत्रंही खात नाही. पण यावर आता तोडगा काढण्यात येतो आहे. रोजच्या रोज बदलणाऱ्या आणि अधिकाधिक क्लिष्ट होत चाललेल्या या सायबर फसवणुकीच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांपासून ते अगदी सुशिक्षित व्यक्तींनाही कोट्यवधींचा फटका बसत आहे. त्यामुळेच दिल्लीमध्ये सध्या सुरू करण्यात आलेल्या 'ई-झिरो एफआयआर' या पथदर्शी प्रकल्पाकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने सायबर गुन्ह्यांची गांभीर्याने दखल घेत 'ई-झिरो एफआयआर' ही योजना दिल्लीत सुरू केली आहे. या अंतर्गत सायबर फसवणूक झाली आणि जर ती रक्कम दहा लाखांपेक्षा जास्त असेल, तर त्या तक्रारीचे तात्काळ एफआयआरमध्ये रूपांतर केले जाणार आहे. परिणामी, संबंधित गुन्हेगाराच्या खात्यात रक्कम वळती होण्याआधीच ती थांबविणे शक्य होणार आहे. यामुळे फसवले गेलेल्या व्यक्तीला आपले पैसे परत मिळविण्याची संधी निर्माण होते. आज सायबर गुन्हेगारी केवळ एखाद्या बनावट ई-मेल किंवा मेसेजपुरती मर्यादित राहिलेली नाही. बनावट लिंकवर क्लिक करून बँक खात्याची माहिती घेणे, मोबाईलवरून 'केवायसी अपडेट'च्या नावाखाली ॲप डाऊनलोड करवून कंट्रोल घेणे, किंवा थेट फोन करून वीज तोडली जाईल असे सांगून पैसे मागवणे. हे सगळे नवीन ट्रेंड बनले आहेत. गुन्हेगार इतके प्रशिक्षित आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाले आहेत की, काही क्षणातच पैसे एका खात्यातून दुसऱ्या खात्यात हलवून काढून घेतात. पण आता याच्यावर आळा बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'झिरो एफआयआर' ही संकल्पना नवी नाही. विशेषतः महिलांवरील गुन्ह्यांच्या बाबतीत, तक्रार कोणत्याही पोलीस ठाण्यात घेऊन ती नंतर संबंधित ठाण्याकडे वर्ग केली जाते. अशाच धर्तीवर आता 'ई-झिरो एफआयआर' योजना राबविण्यात येत आहे. यात ऑनलाईन तक्रार दाखल होताच ती थेट गुन्ह्यात रूपांतरित होते. त्यामुळे वेळ वाचतो आणि कारवाई लगेच सुरू होऊ शकते. या योजनेनुसार, नागरिक सायबर क्राइम हेल्पलाइन १९३० वर कॉल करू शकतात किंवा सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार नोंदवू शकतात. एकदा ही तक्रार नोंदवली गेली की, ती थेट एफआयआरमध्ये बदलली जाते आणि संबंधित पोलीस ठाण्याकडे ती वर्ग होते. तक्रारदाराने नंतर तीन दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात भेट देऊन गुन्हा औपचारिकरीत्या नोंदवायचा असतो. ई-झिरो एफआयआरमुळे फसवणुकीची रक्कम बँक खात्यात अडकवणे शक्य होणार आहे. यामुळे एकदा का रक्कम रोखण्यात आली, की ती परत मिळवण्याची शक्यता वाढते. आतापर्यंत अनेक प्रकरणांमध्ये केवळ एफआयआर नोंद न झाल्यामुळे रक्कम परत मिळण्यात अडथळे आले आहेत. त्यामुळेच ही योजना फसवणूकग्रस्तांसाठी दिलासा ठरू शकते. सध्या ही योजना दिल्लीत प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. परंतु केंद्र सरकारचा पुढील टप्प्यात ही योजना संपूर्ण भारतात लागू करण्याचा विचार आहे. सुरुवातीला फक्त दहा लाख किंवा त्याहून अधिक रकमच्या तक्रारी घेण्यात येणार असल्या, तरी भविष्यात किमान रकमेचा निकष कमी करण्याचा विचार सुरू आहे. गृह मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत देशात ३६ हजार ४५० कोटी रुपयांहून अधिक रकमेची सायबर फसवणूक झाली आहे. ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे वास्तव पाहता, या समस्येवर सरकार, यंत्रणा आणि नागरिक यांना एकत्र येऊनच उपाय शोधावा लागणार आहे. कुठल्याही प्रणालीपेक्षा महत्त्वाचे आहे नागरिकांचे भान आणि सतर्कता. अनोळखी कॉल, लिंक, मेसेज यांना प्रतिसाद देणे टाळणे, हीच प्राथमिक पायरी आहे. एक बटण दाबून तुमची संपूर्ण आर्थिक माहिती कोणी घेत असेल, याची जाणीव ठेवली पाहिजे. ई-झिरो एफआयआर ही योजना सायबर फसवणुकीवर तात्काळ आणि प्रभावी कारवाईसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. मात्र त्याचे यश केवळ प्रणालीवर अवलंबून नाही, तर नागरिकांच्या जागरूकतेवरही आहे. या डिजिटल युगात संरक्षण ही आपली जबाबदारी आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. सायबर फसवणूक थांबवायची असेल तर तांत्रिक उपायांबरोबरच मानसिक सजगता ही काळाची गरज आहे!

# 'शिवराज्याभिषेकांचा हेतू आणि वर्तमान स्थिती'



छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक संपूर्ण देशात नुकताच साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी काही महत्त्वाचे हेतू डोळ्यासमोर ठेवून हा राज्याभिषेक करून घेतला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांचे हित जाणले. लढाई करते वेळेस शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही स्पर्श होणार नाही, याची सैनिकांना तंबी दिली होती.परंतु आज शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे. सहा-सहा महिने शेतकरी आंदोलन करून सुद्धा शेतकऱ्यांच्या बाजूने न्याय मिळाला नाही. ही खेदाची बाब आहे. उठसूठ कोणीही शेतकऱ्यावर बोलून तोंड सुख घेत आहेत.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशाला शेतकऱ्यांची आणि सैनिकांची अत्यंत गरज आहे. तरच आपण सगळे गुण्यागोविंदाने येथे नांदू शकाल. त्यासाठी महाराजांनी जीवात जीव असेपर्यंत शेतकऱ्यांना आणि मावळ्यांना सांभाळले हे या ठिकाणी सांगावेसे वाटते. पर्यावरणाच्या दृष्टीने सांगायचं असेल तर झाड वाळल्याशिवाय कोणीही तोडू नये. अशी सक्ती त्यांनी सर्वांना केली होती. आज जर पाहिलं तर सगळीकडे रस्ते तयार करण्यासाठी झाडे तोडली जात आहेत. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. हेही लक्षात ठेवणे आज गरजेचे आहे. आपल्या देशात सध्या फक्त २३ टक्के जंगल शिल्लक राहिलेले आहे. त्यामुळे आज तापमान ४७ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे. आपले राज्य नीतीनेमाने चालावे. वडीलधाऱ्या व्यक्तींचा मान ठेवला जावा. सर्वांशी आपण आपुलकीने वागावे. बोलावे, म्हणून ६ जून १६७४ रोजी शनिवारी काशीचे विद्वान पंडित गागाभट्ट यांच्या हस्ते रायगडावर शिवराज्याभिषेक करण्यात आला. पाच नद्यांचे पाणी आणून सर्वांसमक्ष राज्याभिषेक सोहळा रायगडावर अतिशय आनंदाने पार पडला. महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी ज्यांनी ज्यांनी बलिदान दिले. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. बालसवंगडी, मावळे, सरदार, आप्तस्वकीयांनी व बांधवांनी रक्त सांडले, तलवारीचे घाव सोसले, अनेक महिला विधवा झाल्या. अनेक तरुण लढाईत धारातीर्थी पडले. या सगळ्यांचे दुःख पचवून महाराजांनी स्वतः ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक करून घेऊन रयतेचे राजे झाले. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा होती, असे सांगितले.

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार सन्मान दिला. कोणतीही जात, पात, धर्म, पंथ पाहिले नाही, भेदभाव केला नाही,सर्व आपण समान आहोत. म्हणून अठरापगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. प्रत्येक माणसाची कर्तबगारी पाहून त्यांना तिथे कार्य करण्यास सांगितले. अनेक शत्रूच्या तावडीतून सुटून परकीयांच्या विरोधात मोहिमा काढून आपले हिंदवी स्वराज्य स्थापन केले. सध्याची परिस्थिती मी हे केले ? मी ते केले ?असे लोक सांगत आहेत. महाराजांनी कोणत्याही गडाला स्वतःचे नाव दिले नाही. कोणत्याही रस्त्याला,चौकाला

,शहराला आपले नाव दिले नाही.

सध्याची परिस्थिती पाहता रात्रंदिवस लोक आपलं नाव छापून येण्यासाठी पुढे पुढे करत आहेत. अनेक जातीसमूह आपल्या आपल्या झेंड्याखाली वावरत आहेत.कोणता झेंडा घेऊ हाती म्हणण्याची वेळ सर्वसामान्य माणसावर आलेली आहे. दररोजच्या व्यवहारांमध्ये जात पाहून काही लोक कार्य करत आहेत.अनेक ठिकाणी लोकांना घर भाड्याने घेते वेळेस सुद्धा जात विचारली जात आहे. जातीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

हे समूहाला, गटाला,मानव जातीला देशहिताला,राष्ट्रहिताला, धोकादायकच आहे. सर्वांनी आपण एक आहोत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, दक्षिण आफ्रिकेचे समाजसुधारक नेल्सन मंडेला हे जातीनुसार नसून परिश्रमाने मोठे झालेले महान व्यक्ती आहेत. अशी एकजूट ठेवून कार्य केल्यास आपला देश भरभक्कम व बळकट होईल होईल. दिल्लीचेही तक्त राखतो महाराष्ट्र माझा, असे आपण गर्वाने म्हणतो.

या देशातील महिला शूरवीर आहेत. शूरवीरांचे आपण वारसदार आहोत.परंतु अलीकडच्या काळात जाती-जातीमध्ये लहान मोठेपणा आलेला आहे. महिलांविषयी अपशब्द काढले जात आहेत. महिलांना दुय्यम स्थान दिलं जात आहे.कर्तबगार महिलांना सुद्धा पाठीमागे ठेवले जात आहेत. काही तीर्थस्थळी महिलांना प्रवेश दिला जात नाही. अशामुळे महिलांचे खच्चीकरण होत आहे.

अनेक शहरांची नावे बदलून इतर नाव ठेवण्यात अनेक मंडळी पुढे येत आहेत. असं जर होत असेल तर राष्ट्रहिताला अगोदर महत्त्व द्यावे. नंतर व्यक्ती निष्ठेला महत्त्व द्यावे. आजपर्यंतच्या समाजसुधारकांनी जात पाहिली नाही. प्रभूची लेकरे सारी म्हणून त्यांनी हे सगळं कार्य केले. परंतु वर्तमान स्थितीमध्ये कारखानदारी, व्यापारी संकुल, शहरातील चौक हे आपापल्या धर्मानुसार,जातीनुसार नाव देऊन अल्पसंख्यांकावर अन्याय होत आहे, त्यांच्याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही, त्यांची मुस्कटदाबी व दमछाक होत आहे. भयभीत वातावरण झालेले आहे.असं जर होत असेल तर देशाचे शकले उडतील. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले ते आपल्याला टिकवायचे आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आपला देश पुढे जातो आहे, महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानले होते. ते आता आपण हळूहळू विसरत चाललो आहोत. रायगडावरुन खाली रात्रीच्या वेळी येणाऱ्या हिरकणीलाही त्यांनी सन्मानित करून पाठविले. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सुद्धा साडीचोळी देऊन परत पाठविले आहे. हा आपला प्रेरणादायी इतिहास सांगतो. त्यामुळे राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यासाठी आपण सगळेजण उत्सुक आहोत. राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत आहोत. त्या अगोदर सर्वांची भाषा राष्ट्रीय एकात्मतेची असावी. दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्यासाठी आपण तत्पर असावेत, कोणी लहान किंवा मोठा नाही याची जाणीव सर्वांना असावी.प्रसार माध्यमांनी सुद्धा सर्व जाती-धर्माच्या सुधारकांची, क्रांतिकारकांची माहिती छापावी. कोणत्याही योजना असल्या तर सर्व समाजा पर्यंत पोहोचाव्यात, जातीचे राजकारण जर आपल्या देशात घुसले तर त्याचे विपरीत परिणाम आपल्याला भोगावे लागतील. काही लोकांचा उदो उदो केला जातो. बाकीच्या लोकांना विचारले सुद्धा जात नाही. समाजामध्ये अशा घटना घडत आहेत. साधुसंतांनी एकात्मतेचा संदेश दिला. संत,महंत,तंत यांनी मानव धर्म शिकवला.संत नामदेव,संत कबीर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, संत गोरोबा कुंभार,संत जनाबाई, संत सोयराबाई,संत सावता माळी, संत एकनाथ,संत नरहरी महाराज,संत नरसी मेहता या सर्वांनी आपण सगळे एक आहोत. अशी शिकवण दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यामुळेच समानतेचा संदेश देण्यासाठी सर्वांसमक्ष राज्याभिषेक करून घेतला. त्या राज्यभिषेकाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपले वर्तन सुधारावे. जीवाला जीव देणारे एकनिष्ठ व्यक्ती महाराजांनी त्यांच्या काळात तयार केले होते. स्वराज्य हा त्यांचा जीव की प्राण होता.सेनापती हंबीरराव मोहिते,तानाजी मालुसरे,बाजीप्रभू देशपांडे, मदारी मेहतर, भंडारनायके,शेलार मामा, येसाजी कंक. शिवा काशिद या व्यक्तीनी जीवाची पर्वा न करता स्वराज्यासाठी आयुष्यभर झिजले. हे स्वराज्य रक्तानी न्हाऊन निघाले. सडा मांसाचा चिखल झाला होता. हजारो वीर स्वराज्यसाठी बलिदान दिले. फितुरी करणाऱ्यांना कडक शासन महाराजांनी केले.फितूरी हा आपल्या समाजाला लागलेला कलंक आहे. खंडोजी खोपडे, सूर्याजी पिसाळ यांना कडक शासन केले.अनेक कर्तबगार व्यक्तींना आपल्याच जवळच्या लोकांनी पैशाच्या आमिषाला बळी पडून लपून छपून बसलेले ठिकाण दाखवले आहेत. त्यात तात्या टोपे, उमाजी नाईक यांचा हकनाक बळी गेला आहे. इंग्रज, फ्रेंच, सिद्धी,मोगल,पोर्तुगीज,डच या सर्वच परकीयांना सळो की पळो करुन सोडले होते. ठकास महाठक म्हणून त्यांनी आपले कार्य पूर्णत्वाला नेले.सुरतेची बेसुरत केली.आदरयुक्त भीती महाराजांची सर्वांनाच होती. ताठ मानाने त्यांनी संपूर्ण जीवन जगले.जीवनात थोडी तडजोड ही केली. पुरंदरचा तह करून दोन पाऊल पाठीमागे आले, परंतु नंतर लागलीच पाठ फिरता संपूर्ण किल्ले जिंकून घेतले, कधीही शरणागती स्वीकारली नाही. हत्तीचं बळ असणाऱ्या माणसांना तयार केले. कुतुबशाही, इमादशाही, वऱ्हाडशाही, मुघलशाही, निजामशाही या सर्वांना वठणीवर आणले, हर हर महादेवची गर्जना करून भगवा झेंडा फडकवला, म्हणून तर इंग्रजांचा प्रतिनिधी रायगडावर राज्याभिषेकाच्या वेळी जातीने उपस्थित होते. अशा प्रकारे महाराजांनी जे कार्य करून ठेवलेले आहे त्या कार्याची आपण सगळ्यांनी स्मरण करावे.

राष्ट्रीय एकात्मता दाखवावी. ज्यांचा समुद्र त्यांचे राज्य म्हणून महाराजांनी समुद्रावर अधिराज्य गाजविले ते आरमाराचे प्रमुख होते. परंतु अलीकडे ढिसाळ वातावरणामुळे इतर देशातील व्यक्ती मुंबईवर हल्ला केले हे बाब आपल्यासाठी भूषणावह नाही याची मनाला खंत वाटते.आपणही महाराजांसारखे शूरवीर व्हावेत, शत्रूला नामोहरम करावे,सत्याच्या बाजूने चालावे, परस्त्रीला मातेसमान मानावे, पर्यावरणाचे रक्षण करावे. पर धर्मियांचा सुद्धा आदर करावा, कर्तृत्ववान व्यक्तीचा सन्मान करावा. शिवराई आणि होन यासारखे त्यांनी नाणी पाडले. शक हि कालगणना सुरू केली. राजमुद्रा तयार करून सर्वांना हे राज्य चंद्राच्या कलेप्रमाणे वाढावे असे प्रेरणा दिली. सध्याचे राजकारण अतिशय गढूळ झाले आहे. पक्षांतर होऊन अनेक लोकांची निष्ठा कमी झाली आहे. असे जर होत राहिले तर महाराजांनी केलेला कार्य किती दिवस टिकेल याबद्दल मनात शंका निर्माण होते. महाराजांनी सर्व जाती धर्मांना एकत्रित केले .परंतु काही चतुर लोकांनी वेदोक्त प्रकरण काढून इतरांना कमी समजले असे होता कामा नये.वरील सर्व कार्य व्यवस्थित चालले तर आपल्याला महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण झाले असे म्हणता येईल.नाही तर स्वराज्याची शकले उडवून परकीय सत्ता भारतात येण्यास काहीच उशीर लागणार नाही. हे या लेखाच्या निमित्ताने सांगावे वाटते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने सर्वांना मंगलमय शुभेच्छा.

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
सदस्यः निसर्ग व सामाजिक पर्यावरण
प्रदूषण निवारण मंडळ. अहिल्यानगर

# झाडं लावण्यासाठी सरकारनेच पुढाकार घ्यावा!

आज उष्णतामान फारच वाढलं आहे. सकाळी उठलं की या उष्णतेनं झोप न लागत असल्यानं सतत मळमळ व उलटीसारखं वाटायला लागतं. त्यातच रात्रभर कुलर जरी आपण लावून झोपलो, तरी पुरेशी झोप होत नाही. त्याला कारण आहे आजची परिस्थिती. आज परीसरात झाडं नसल्यानं ही स्थिती आहे व ही स्थिती आजच एवढी भयावह आहे आणि संकेत देत आहे की जर अशीच परिस्थिती नेहमीसाठी सुरु राहिली की उद्या तो दिवस दूर नाही की हीच परिस्थिती सर्वांना जाळत सुटेल.

काल रस्ते होते व रस्त्याच्या दोन्ही बाजूला डेरेदार झाडं होती. तसेच ते रस्ते डांबराचे असून ते जास्त गरम होत नसत. आज मात्र त्या डांबरी रस्त्याच्या जागेवर सिमेंटचे रस्ते आले व ह्या सिमेंटच्या रस्त्यानं तापमान वाढवलं. तापमान एवढं वाढवलं की त्या तापमानानं लोकांचा जीव धोक्यात आला.

आज उष्णतामान वाढलं आहे. याला कारणीभूत आहे मोठमोठ्या सडका बनवणे व त्यासाठी उभी असलेली झाडंची झाडं तोडणं. अशी झाडं तोडली गेली व सिमेंटचे रस्ते बांधकाम केले गेले. मात्र काल रस्त्याच्या दोन्ही कडेला असणारी झाडं तोडली परंतु आज सिमेंट रस्त्याचं बांधकाम पुर्ण झालं तरी काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला आजही झाडं लावली गेली नाहीत. याला जबाबदार कोण? याला साहजीकच प्रशासन जबाबदार आहे. व्यतिरीक्त सर्व लोकं म्हणतात व झाडं नसल्याचा दुष्परिणाम सांगतात. परंतु स्वतः झाडं लावत नाहीत व झाडं लावण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. ते फक्त बोलतात. कृती मात्र शुन्य असते.

काल अंगणात झाडं होती. कुलर वा एसी बहुतांश नव्हताच. तो अतिशय श्रीमंत माणसांकडे असेलही कदाचीत. परंतु गरीबांकडे तो अजीबात नव्हताच. त्यावेळेस घरातील सर्व मंडळी अंगणात असलेल्या झाडाखाली पलंग टाकत असत व रात्रीची निवांत झोपही घेत असत. आज मात्र तसं नाही. आज लोकांचं उन्हाळ्यातील आयुष्य कुलर आणि एसीमध्येच जात असतं. लोकांना आज अजीबात उष्णतामानाचे चटके सहन करायला वेळ नाही. समजा कुलर नसेल तर पंख्याच्या हवेची तरी मजा घेतात आजचे लोक. परंतु झाडाखाली झोपत नाहीत. कारण झाडंच नाहीत.

काल झाडाबाबत बरेच समज गैरसमज होते. जसं चिंचेच्या झाडाखाली झोपू नये. लावडीन येते. चिंचेच्या झाडाखाली झोपू नये. चिंचेचं झाड कार्बन डायऑक्साईड वायू सोडतो. जो वायू श्वसनाला मदत करीत नाही तर माणसाला मारतो. परंतु आज ते चिंचेचं झाडंही दिसत नाही. अशी चिंचेची झाडं गावांमध्ये चौकाचौकात दिसायची. आज ती तोडली असल्यानं अजीबात दिसत नाहीत. मग झाडंच नाहीत तर ऑक्सिजन येणार कुठून? मग माणसाला गुदमरल्यासारखं नाही लागणार तर कसं लागेल. महत्वपुर्ण बाब ही की आज तापमान वाढलं आहे असे सारेच जण म्हणतात. परंतु त्या वाढत्या तापमानावर कोणीच उपाययोजना करायला तयार नाहीत. झाडं लावावीत ही ओरड आजची नाही. त्याला कमीतकमी वीस पंचवीस वर्षाचा काळ झाला. परंतु कोणीच झाडं लावली नाहीत वा लावण्याचा प्रयत्न दाखवला नाही. हं, रस्ते रुंदीकरणासाठी झाडं मात्र तोडण्याचा नक्कीच प्रयत्न केला. सर्वत्र उदासीनता. याबाबत खरं सांगायचं झाल्यास आजच्या काळात आळसच भरला आहे लोकांत, असंच जाणवतं. काल घराघरामधील खिडक्या व दरवाजेही उघडे राहायचे. आज त्याला उघडं ठेवायला जागा नाही. फ्लॅटच्या जिंदगीत तर दरवाजे बंदच असतात. बेल वाजवूनही उघडली जात नाहीत दारं. मग कुठून मिळणार मोकळी हवा? म्हणूनच श्वास गुदमरतो आहे. अलिकडे तर खिडक्याही बंद असतात.

विशेष बाब ही की आज तापमान वाढले आहे, वाढते आहे. यावर एकमात्र उपाय म्हणजे झाडं लावणे व त्यांचं संगोपन करणे. आज जर झाडं लावली तर त्याची फळं उद्या नक्कीच मिळणार. शिवाय झाडं लावा असं सगळेजण म्हणतात. परंतु झाडं कोणीच लावत नाहीत. तेव्हा हा उपक्रम सरकारनं राबवावा. सरकार जर हा उपक्रम राबवेल, तर नक्कीच झाडं लावली जातील. जी तापमान वाढीला मर्यादा घालतील.

झाडं कुठं लावावीत?

झाडं ही ओसाड माळरानावर, रस्त्याच्या दोन्ही कडेला, आपल्या प्रत्येकाच्या घरी, शाळेत, ग्रामपंचायत मध्ये, स्थानीय, सरकारी, खाजगी अशा प्रत्येक इमारतीत तसेच जी जी मोकळी जागा असेल, त्या प्रत्येक ठिकाणी झाडं लावावीत. जेणेकरुन तापमान कमी करता येईल.

झाडं कोणं कोणं लावावीत?

झाडं लावण्याचा जो उपक्रम आहे. तो सर्वांनीच राबवावा. सर्वांनीच जिथं जागा मिळेल, तिथं झाडं लावण्याचा प्रयत्न करावा. झाडं असतील तर आपण सुखी होवू, हा एकच मुलमंत्र डोक्यात ठेवावा. बाकी सर्व विसरुन जावं. झाडं लावणं याला एक उपक्रमच समजावे व तो उपक्रम आपण जसे राबवणार. तसाच तो उपक्रम सरकारनंही राबवावा. याला प्रश्नाचे स्वरुप देवू नये. कारण जसे, इतर कोणी झाडं लावा म्हटलं तरी झाडं कोणीच लावत नाहीत. त्यासाठी झाडं लोकांनी लावली पाहिजेत म्हणून सरकारनं योजना देतांना ज्यानं झाड लावलं त्यालाच योजनांचा लाभ द्यावा. इतरांना नको. शिवाय जे झाड लावलं. त्या झाडावर आपल्या नावाची पाटी असावी असं बंधन घालावं. सेल्फी काढता आला तर काढायला लावावा. तो व्हायरल करायला लावावा. जो इतरांना प्रेरणा देईल. झाडं जगली पाहिजे म्हणून शासनाने सर्वांनाच कठडे पुरवावे. शिवाय झाडं ही प्रत्येक घरी एक याप्रमाणे रचना असावी. ज्यात नगरपालिका, ग्रामपंचायत, महानगरपालिका, स्थानीय वसाहत, काही समाजसेवक, पोलीस प्रशासन या सर्वांनी पुढाकार घ्यावा. जेणेकरुन झाडं अति प्रमाणात लावली जातील व तापमान वाढीला मदत होईल.

महत्वाचं सांगायचं झाल्यास तापमान वाढ हा भष्मासूरच आहे. याचे परीणामही दूरगामी होत आहेत. ते आपणाला पाहायला मिळत आहेत. तसाच जेव्हा जेव्हा उन्हाळा येतो आणि तापमान वाढ दिसते. तेव्हा तेव्हा आपणाला तापमान वाढीवर उपाय म्हणून झाडं लावण्याचा विचार करतो माकडाच्या कथेसारखा आणि उन्हाळा संपलाच तर आपली आठवण विसरुन जाते. मग वर्षभर उन्हाळा येईपर्यंत आपल्याला झाडं लावण्याची आठवणही येत नाही. जसं एक माकड पावसाळा लागताच ओला होतो व त्याला वाटते की आपण पावसापासून संरक्षण करण्यासाठी एक घर बांधायला हवं. परंतु जसा पावसाळा संपतो. तशी त्याची आठवण संपते. ती पुढील पावसाळा येईपर्यंत. आपलीही झाडं लावल्याबद्दल हीच गत आहे. उन्हाळा आला की झाडं लावण्याची आठवण येते आणि उन्हाळा गेला की ती आठवण संपून जाते. कारण आपणही माकडाचेच वंशज आहोत. म्हणूनच हे चालणारच. परंतु हे जरी खरं असलं तरी आज गरज आहे झाडं लावण्याची. माकडाचं ठीक आहे की त्याचं भागून जातं व तो एक प्राणी असल्यानं त्याला ते कळत नाही. परंतु आपण माणूस आहोत व आपल्याला जाणीव आहे. आपण झाडं लावू शकतो. तसंच ती झाडं लावून आपण आपलंच नाही तर कित्येक प्राण्यांचंही संरक्षण करु शकतो हे तेवढंच खरं आहे. म्हणूनच कोणी सांगायची वाट पाहण्याऐवजी आपण स्वतःच पुढाकार घेवून झाडं लावलेली बरी हे तेवढंच खरं आहे. कारण झाडंच आपल्याला मारणार आहेत आणि तीच आपल्याला तारणारही आहेत.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले.



मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या?

गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेसे पोलीस बळ होते का? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल.

क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे

## थोडक्यात...

### ‘एसएफआय’च्या राज्य उपाध्यक्षपदी विजय लोहबंदे यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदगाव खंडेश्वर (जि. अमरावती) येथे पार पडलेल्या ‘एसएफआय’ विद्यार्थी संघटनेच्या अधिवेशनात विद्यार्थी संघटनेची नवीन कार्यकारणी करण्यात आली. यात विजय लोहबंदे यांची संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. विजय लोहबंदे यांनी आजवर विद्यार्थी हितासाठी अनेक आंदोलने आणि चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांची तळमळ, संघटन कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची सखोल जाण यामुळे ते विद्यार्थी वर्गात लोकप्रिय आहेत. एसएफआयच्या राज्य उपाध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याने, विद्यार्थ्यांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील आणि त्यांच्या न्याय हक्कांसाठीचा लढा अधिक तीव्र होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### समाज माध्यमावरुन तलवारधारी युवकाला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या शिवणी (ता. किनवट) येथील अलीम सलीम खान पठाण (वय १९) याने आपल्या सोशल माध्यमाच्या एका अकाउंटवर हातात तलवार घेऊन फोटो व्हायरल केला होता. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्याने फोटोद्वारे समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सायबर सेलच्या माध्यमातून इस्लापूर पोलिसांनी त्याला अटक करून त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले करत आहेत.

# राष्ट्र सेवा दल म्हणजे देशभक्ती, सामाजिक मूल्यांची शिकवण देणारी पाठशाळा –सदाशिव मकदूम





**नांदेड (प्रतिनिधी)** – बालकांमध्ये राष्ट्रप्रेम, लोकशाही मूल्ये, सेवा भाव, सामाजिक समता व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी राष्ट्र सेवा दलाचे कार्य मोलाचे आहे. हे शिबीर म्हणजेच एक देशभक्त घडवणारी पाठशाळा आहे, असे प्रतिपादन राष्ट्र सेवा दलाचे सदाशिव मकदूम यांनी केले.

भारत जोडो युवा अकादमीचे साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथे दि. ४ जूनपासून रोजी राष्ट्र सेवा दलाचे विज्ञान, साहस व छंद शिबिर सुरू आहे. या शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

सदाशिव मकदूम पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात या राष्ट्र सेवा दल संघटनेची स्थापना झाली. आजही ही संघटना तरुणांमध्ये शिस्त, नेतृत्व, सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि विवेकशील विचारांचा प्रसार करण्याचे कार्य करत आहे. अंधश्रद्धा, रूढी, कुप्रथा यांच्या विरोधात वैज्ञानिक विचारसरणीची जाणीव निर्माण करण्यासाठी राष्ट्र सेवा दल शिबिर उपयुक्त ठरते, असेही मुकदम म्हणाले.

या शिबिराचे दुसरे उद्‌घाटक व प्रसिद्ध निवेदक उत्तमराव कानिंदे म्हणाले की, शिबिर हे आपल्या आवडी, छंद व प्रतिभा विकसित करण्याचे उत्तम माध्यम आहे. यातून वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाण आणि आत्मविश्वास वाढतो. याचा आपणाला भरपूर लाभ होणार आहे, याचा मला पूर्ण विश्वास आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे हे होते. ते म्हणाले की, आपला परिसर नैसर्गिक व सांस्कृतिक संपत्तीने समृद्ध आहे. तसेच आपल्या सर्वांसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांच्यावर मात करुन पढे जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठीच या शिबीराची आखणी केली आहे. राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून आपण देशाच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन बेलखोडे यांनी केले.

दि. ८ जून रोजी शिबिराचा समारोप होणार आहे. या शिबिरात किनवट तालुक्यातील १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. प्रारंभी साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उत्तम कानिंदे यांचा सत्कार करण्यात आला. सदाशिव मकदूम यांचे स्वागत मा. डॉ. योगेंद्र वरटकर यांनी केले. सीमा सरपोतदार यांचे स्वागत डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. कोमल मकदूम यांचे स्वागत डॉ. भाग्यश्री बेलखोडे वरटकर यांनी केले. प्रशिक्षक शौर्य यांचे स्वागत समाजकार्य प्रशिक्षणार्थी नेहा आडे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तेजस्विनी उईके यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमास प्रा. डॉ. वसंत राठोड, राम राठोड व पालक पालक उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रेमसिंग बसी, नितीन टापरे, मनोज चमनवार, संजय बोलेनवार, नागेश देवतळे, कल्पनाताई तोडसाम, बादल पवार, विपीन पवार, दशरथ काका यांनी परिश्रम घेतले.

## मनपाच्या शाळांमध्ये ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रमाची सुरुवात



**नांदेड (प्रतिनिधी)**– जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वजिराबाद येथील पीएमश्री मनपा शाळेत ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमाची सुरुवात करण्यात झाली. नांदेड मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या निर्देशानुसार शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यासाठी मुख्याध्यापक श्री परमेश्वर माहुरे व शिक्षक व विद्यार्थी पालक यांची उपस्थिती दिसून आली.

‘एक पेड माँ के नाम’ हा उपक्रम ३० सप्टेंबर पर्यंत चालणार आहे. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे, शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्ष लागवड व त्याचे संगोपन करण्याचा शिक्षक पालक व विद्यार्थी यांनी संकल्प केला. ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी’ या उक्तीप्रमाणे वृक्ष आमच्यासाठी किती महत्त्वाचे आहेत व त्यापासून मिळणारे फायदे मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे यांनी सांगितले. वृक्ष लागवड शालेय परिसरात केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘इको क्लब फॉर मिशन लाईफ’ उपक्रम देशभर राबविण्याचे आवाहन केले. ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमाची शाळेत खूप उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी सहशिक्षक केरबा मगरे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष प्रकाश गजभारे, सेविका पूजा गिरी उपस्थित होत्या.

> ‘एक पेड माँ के नाम’ या आवाहनात आत्मियता आहे. मातृप्रेम पर्यावरणाच्या रक्षणातून व्यक्त करण्याची संधी देणारा हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्व शाळांनी विद्यार्थ्यांची याबाबत जाणीवजागृती करून जास्तीत जास्त झाडे लावावीत.
>
> **–व्यंकटेश चौधरी, शिक्षणाधिकारी मनपा**

## छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या नृत्य विभागाचा ‘लंबाडी’ ठसका; गोव्यातील स्पर्धेत अव्वल




**सगरोळी (प्रतिनिधी)**– सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन आणि अखिल नटराजम आंतरसंस्कृती संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोवा येथील बोंढारकर मार्ग, पणजी येथे दिनांक २ ते ५ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी ‘लंबाडी’ नृत्य सादर केले. छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या नृत्य विभागाने आपल्या कसदार सादरीकरणातून आंतरराष्ट्रीय मंचावर आपली छाप पाडत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

लहान गटातून सादर करण्यात आलेल्या या लोककला सादरीकरणाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून, हायस्कूलच्या सांस्कृतिक विभागाच्या इतिहासातील हे एक ऐतिहासिक यश ठरले आहे.

व्यवस्थापक गोविंद बोधनकर, नृत्य प्रशिक्षक पंकज कंधारे आणि त्यांच्या सहचारिणी सौ. कंधारे यांचे मार्गदर्शन लाभले. या गौरवप्रसंगी संस्थेचे कुटुंबप्रमुख अण्णा, संचालक रोहित देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते, शैक्षणिक समन्वयिका श्रद्धा देशमुख यांनी नृत्यगटातील बालकलाकारांचे व त्यांना घडवणाऱ्या शिक्षकांचे कौतूक केले आहे. संस्था परिवाराच्या वतीने सर्व विजयी कलाकार व मार्गदर्शक टीमचे अभिनंदन करण्यात आले.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरणवाडीत रॅली व स्वच्छता मोहीम



**लोहा (प्रतिनिधी)**– कमल उदवाडिया फाउंडेशन, कारपे संस्था व ग्रामपंचायत पिंपरणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तालुक्यातील पिंपरणवाडी येथे गुरुवारी (दि. ५ जून) ‘माझी पिंपरणवाडी स्वच्छ पिंपरणवाडी’ अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत गावात स्वच्छता करून स्वच्छता रॅली काढण्यात आली. यावेळी ग्रामविकास अधिकारी गोरडे, सरपंच प्र.व्यंकटी कटवाड, उपसरपंच नरबा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्वच्छता मोहिमेत गाव परिसरातील उघड्यावर, नाल्यात पडलेला सुका कचरा संकलीत करण्यात आला. मुख्य रस्ते स्वच्छ करण्यात आले. गावातील नागरिकांना सुका कचरा उघड्यावर, नदी नाल्यात इतरत्र टाकू नये याचबरोबर चुली मध्ये जाळू नये याबाबत जागृती करण्यात आली.

नागरिकांना पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कोणीही अस्वच्छता करू नये, सर्वांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. गावात स्वच्छता राखण्यासाठी विविध जनजागृती कार्यक्रम घेण्याचा निर्धार करून तसा ठरावही घेण्यात आला आहे. ‘माझी पिंपरणवाडी, स्वच्छ पिंपरणवाडी’ या घोषवाक्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानोबा मोरे, शोभा जाधव, आशा कार्यकर्त्या, प्रतिभा भगत, अंगणवाडी सेविका गयाबाई जाधव, आरोग्य सखी सोमनाथ जाधव, ग्रामपंचायत सेवक, ग्रामपंचायत सदस्य विमलबाई जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष, कारपे संस्था संघ प्रमुख राहुल निकम, मल्हारी पंडित, मुकिंदा भोसले, हिरामण हेंडगे यांनी परिश्रम घेतले.

## कायापालट उपक्रमाअंतर्गत ४८ निराधारांचा कायापालट




**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड गेल्या ५९ महिन्यांपासून सलग दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबवला जाणारा ‘कायापालट’ उपक्रम यंदा जून महिन्यातही यशस्वीरित्या पार पडला असून ॲड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली ४८ बेघर, अपंग, कचरा वेचक आणि मानसिक रुग्णांची दाढी-कटिंग, अभ्यंगस्नान करून त्यांना स्वच्छ व नवीन कपडे घालण्यात आले.

या मानवी सेवेच्या कार्यात सुरेश शर्मा, ॲड. चिरंजीलाल दागडिया, अरुणकुमार काबरा, शिवा लोट, संजयकुमार गायकवाड आणि प्रसाद जोशी यांनी शहरातून या उपेक्षित नागरिकांना आणले. स्वयंसेवक राजूअण्णा व प्रसाद पस्पुनूर यांनी अत्यंत काळजीपूर्वक केस-दाढी कापून स्वच्छता केली. विलास जोगदंड यांनी या नागरिकांना स्वतः साबण लावून स्नान घातले. अंघोळीची सोय करणारे भाजप कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांचा वाढदिवसही यावेळी साजरा झाला.

जुलै महिन्यातील ‘कायापालट’ सोमवार, ३० जून रोजी होणार आहे, कारण संयोजक ॲड. दिलीप ठाकूर २५ व्या अमरनाथ यात्रेसाठी रवाना होणार आहेत. उपेक्षित, बेघर व्यक्तींची माहिती रविवार, २९ जून रोजी संयोजकांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतंर्गत ३ लाभार्थ्यांना कर्जासह साहित्याचे वाटप



**किनवट (प्रतिनिधी)**– सुतार व्यवसायाला दिलासा देण्याच्यादृष्टीने सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतंर्गत किनवट शहरातील तिघा लाभार्थ्यांना आ. भीमराव केराम यांच्या हस्ते प्रत्येकी ५० हजार रुपये बिनव्याजी कर्जासह सुतारकामासाठी आवश्यक असणारे साहित्यही वाटप करण्यात आले.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या लाभासाठी किनवट शहरातून दोनशेच्यावर सुतार कारागिरांनी अर्ज केले होते. पहिल्या टप्प्यात मुरलीधर राईंचवार, नरसिंग उटलावार, दत्तात्रय कन्नाजीवार या तिघा लाभार्थ्यांना टपालाद्वारे साहित्य कीट प्राप्त झाले. गुरुवारी दि. ५ साहित्य आ. भीमराव केराम यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

## भाग्यनगर ते शंकरराव चव्हाण मेमोरिअल पर्यंतचा रस्ता तातडीने दुरुस्त करा; अन्यथा आंदोलन

### माजी महापौर सौ.जयश्री पावडे यांचा ‘साबांवि’ला इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहरातील भाग्यनगर ते शंकरराव चव्हाण मेमोरिअल पर्यंतचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. त्यामुळे हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा नांदेडच्या माजी महापौर जयश्री पावडे यांनी दिला आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निधीतून नांदेड शहरातील अनेक रस्ते विकासाच्या भूमिपूजनाचे नारळ फोडण्यात आले होते. यात भाग्यनगर ते शंकराव चव्हाण मेमोरियल या रस्त्याच्या भूमिपूजनाचा कार्यक्रमही वर्षभरापूर्वी करण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या रस्त्याच्या विकास कामाचे नारळ फोडणाऱ्या लोकप्रतिनिधींनी वर्षभरात या रस्त्याकडे फिरकूनही पाहिले नाही. या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. ड्रेनेचे झाकणवर आलेले आहेत. रस्त्यावरून नालीचे घाण पाणी वाहते. त्यामुळे या भागातून प्रवास करणे किंवा पायी चालणे ही कठीण झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र जाणीवपूर्वक या रस्त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. शहर व शहराबाहेरून येणाऱ्या नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करताना मरण यातना सहन कराव्या लागत आहेत. त्यामुळे भाग्यनगर ते शंकराव चव्हाण मेमोरीयल पर्यंतच्या रस्त्याचे नूतनीकरण करावे, अन्यथा आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा माजी महापौर जयश्री पावडे यांनी दिला आहे. मागणीचे निवेदन सा.बां.चे कार्यकारी अभियंत्यांकडे देण्यात आले आहे.

## आंतरजातीय विवाह करण्यासाठी प्रोत्साहन; ६८ जोडप्यांना ३४ लाखांचे आर्थिक सहाय्य

### लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक समता व जातीय भेदभावाच्या निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना सम ाजकल्याण विभागामार्फत प्रभावीपणे राबवली जात आहे. सन २०२४-२५ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील ६८ जोडप्यांनी आंतरजातीय विवाह केला असून, एकूण ३४ लाख रुपयांचे अनुदान त्यांना वितरित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी दिली आहे.

या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विम ुक्त जाती व भटक्या जमातींम धील व्यक्तींनी जर सवर्ण हिंदू, लिंगायत, जैन किंवा शीख समाजातील व्यक्तीशी विवाह केला, तर अशा जोडप्यांना प्रति जोडपे ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते. तसेच या घटकांतील अंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांनाही ही योजना लागू आहे.

या योजनेचा उद्देश सामाजिक सलोखा वाढवणे व जातीय भेदभाव दूर करून समानतेचा संस्कार सम ाजात रूजवणे हा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले आहे.

## ‘महावितरण’च्या ‘सुरक्षा व वीज बचत’ रॅलीला प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड परिमंडळ अंतर्गत वर्धापन दिन (वसुंधरा दिन) व महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड ग्रामीण विभाग व नांदेड शहर विभागाच्या वतीने विद्युत सुरक्षा सप्ताह अंतर्गत गुरुवारी (दि. ५ जून) विद्युत सुरक्षा व वीज बचत रॅली काढण्यात आली. मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता नांदेड ग्रामीण रुमदेव चव्हाण व कार्यकारी अभियंता नांदेड शहर विनय घनबहादुर तसेच उपविभागीय अभियंता, जनमित्र, यांत्राचक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रॅलीत सहभाग नोंदविले.

नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर, परभणी, सेलू व हिंगोली या सात विभागात रॅली काढण्यात आली. सदर रॅलीत महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. समाजामध्ये व वीज ग्राहकांना विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने तसेच विजेची बचत राष्ट्राची बचत ही संकल्पना ठेवून सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नांदेड परिमंडळात महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमानिमित्त शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र या संकल्पनेनुसार दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला.

जनता व वीज ग्राहकांत वीज अपघाताबाबत जागरूकता निर्माण व्हावी, वीज अपघातांचे प्रमाण शून्यावर यावे म्हणून महावितरण कार्य करत आहे. मागील काही वर्षांमध्ये महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे अपघाताचे प्रमाण कमी करण्यात कंपनीला यश आले आहे. परंतु जनतेचे किंवा लहान मुलांचे विद्युत अपघात वाढतच चालले असल्याने समाजामध्ये देखील विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून अपघाताचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने २० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ‘शून्य अपघात महावितरण... शून्य अपघात महाराष्ट्र...’ ही संकल्पना घेऊन दि. १ ते ६ जून २०२५ या काळात नांदेड परिमंडळात वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला.

## डॉ. दिनेश निखाते मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)**– वैद्यकीय क्षेत्रात योगदान देणारे डॉ. दिनेश निखाते यांना मराठवाडा हेल्थ आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथे एका शानदार समारंभात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी आमदार अनुराधा चव्हाण, ए. श्रीनिवास, कल्याण पांडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. आपणास मिळालेला हा पुरस्कार आपण रुग्णसेवेला अर्पण करतो, अशी प्रतिक्रीया डॉ. दिनेश निखाते यांनी व्यक्त केली.

डॉ. दिनेश निखाते यांनी नांदेड शहरासह किनवटसारख्या अतिदुर्गम भागात आरोग्य सेवा दिली आहे. किनवट तालुक्यातील आदिवासी गोरगरीब जनतेची त्यांनी निःस्वार्थपणे रुग्णसेवा केली आहे. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता डॉ. निखाते यांनी नांदेडहून किनवट येथे जाऊन आरोग्य सेवा दिली आहे. शेकडो रुग्णांना त्यांच्या आरोग्य सेवेचा लाभ झाला आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या...



## WhatsApp वर येणार सर्वात आश्चर्यकारक फीचर

**WhatsApp त्याच्या कोट्यावधी वापरकर्त्यांना एक नवीन आणि आतापर्यंतचे सर्वोत्तम फीचर लवकरच भेट देऊ शकते. WhatsApp वर लॉगआउट (Whatsapp लॉगआउट) चा पर्याय लवकरच उपलब्ध होऊ शकतो. याचा फायदा असा होईल की जर तुम्हाला WhatsApp वापरायचे नसेल तर तुम्ही लॉगआउट करू शकाल. असे केल्याने, व्हॉट्सअॅप तुमचा डेटा सुरक्षित ठेवेल आणि तुम्ही कोणत्याही ग्रुपमधून बाहेर राहणार नाही. सध्या, व्हॉट्सअॅपवर लॉगआउट पर्याय नाही. वापरकर्त्याला अकाउंट डिलीट करण्याचा पर्याय दिला जातो, जो निवडल्यावर सर्व वापरकर्त्यांचा डेटा डिलीट होतो. लॉगआउट करण्याचा पर्याय व्हॉट्सअॅप वेबवर उपलब्ध असला तरी, तो वेब आवृत्ती म्हणजेच संगणकावरून लॉग आउट होतो.**

### व्हॉट्सअॅप अकाउंट डिसेबल करू शकाल

व्हॉट्सअॅप लॉगआउट सुविधेमुळे लोक त्यांच्या प्राथमिक डिव्हाइसवरील अॅप बंद करू शकतील. याचा फायदा असा होईल की अकाउंट चालू राहील, परंतु तुम्ही त्यातून बाहेर पडाल. सध्या, काहीही झाले तरी, इंटरनेट चालू असताना वापरकर्ता व्हॉट्सअॅपशी कनेक्ट राहतो. जेव्हा अकाउंट डिलीट केले जाते किंवा फोनवरून व्हॉट्सअॅप अनइंस्टॉल केले जाते तेव्हाच व्हॉट्सअॅप फोनवर काम करणे थांबवते. दोन्ही परिस्थिती लोकांसाठी शक्य नसतात. बऱ्याच वेळा, विशेषतः सुट्टीच्या दिवशी, लोकांना कुटुंबासोबत वेळ घालवायचा असतो. पण फोन अनलॉक होताच बरेच व्हॉट्सअॅप मेसेज येतात. नको असले तरी अॅपकडे पहावे लागते. नवीन फीचरमुळे लोक जेव्हाही हवे तेव्हा अॅप वापरणे थांबवू शकतात. हे त्यांच्या फेसबुक अकाउंट किंवा जीमेलमधून लॉग आउट करण्यासारखे असू शकते.

### अकाउंट स्विच करतात त्यांनादेखील फायदा

या फीचरमुळे त्यांनाही फायदा होईल ज्यांना कोणत्याही युक्त्याशिवाय एका फोनवर दोन व्हॉट्सअॅप चालवायचे आहेत. एका अकाउंटमधून लॉग आउट केल्यानंतर, दुसऱ्या अकाउंटवरून व्हॉट्सअॅप कोणत्याही व्यत्ययाशिवाय वापरता येते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की कंपनी व्हॉट्सअॅपमध्ये सतत नवीन अपडेट्स आणत आहे. अलीकडेच, आयपॅड वापरकर्त्यांसाठी व्हॉट्सअॅप वापरण्यासाठी एक समर्पित अॅप सादर करण्यात आले आहे. असे म्हटले जाते की लॉगआउट दरम्यान, वापरकर्त्यांना दोन पर्याय मिळतील. पहिले, त्यांना त्यांचा डेटा सुरक्षित ठेवायचा आहे आणि दुसरे, त्यांना सर्व डेटा डिलीट करायचा आहे. दोन्ही पर्याय मिळाल्याने, कोणत्याही वापरकर्त्यासाठी खाते हटवण्याची गरज देखील संपेल.

## Google Meet मध्ये मीटिंग शेड्यूल कशी करावी?


**Google Meet ही एक उत्तम सेवा आहे. लोक या अॅपचा वापर मीटिंगसाठी मोठ्या प्रमाणावर करतात. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, मीटिंग, मुलाखत आणि व्हिडीओ कॉलवर एकमेकांशी बोलण्यासाठी अॅपचा वापर करतात. हे अॅप तुम्हाला चॅट, व्हॉईस कॉल आणि व्हिडीओ कॉल करण्याचा पर्याय देते. गुगल मीट सेवेमध्ये अनेक चांगले फीचर्स आहेत जे लोकांनाही माहीत आहेत. पण आज आम्ही तुम्हाला गुगल मीटवर मीटिंग कशी शेड्यूल करायची ते सांगणार आहोत. जर तुम्हाला गुगल मीटचे हे फीचर माहित असेल तर ठीक आहे, पण जर तुम्हाला माहित नसेल तर सविस्तरपणे जाणून घ्या...**

### मीटिंग कशी शेड्युल करावी?

- संगणक/लॅपटॉप किंवा मोबाइलवर Google Meet अॅप उघडा.
- आता New Meeting च्या पर्यायावर क्लिक करा.
- आता तुम्हाला अनेक पर्याय दिसतील. यामध्ये Create a Meeting for Later, Start an Instant आणि Meeting Schedule in Google Calendar Google Calendar हे पर्याय समाविष्ट आहेत.
- येथे तुम्हाला Create a meeting for later या पर्यायावर क्लिक करावे लागेल.
- यानंतर तुम्हाला एक लिंक मिळेल, ती लिंक कॉपी करा आणि ज्या सदस्यांसोबत तुम्हाला मीटिंग करायची आहे त्यांना पाठवा.
- आता या सगळ्यानंतर, जेव्हा तुम्हाला मीटिंग करायची असेल, तेव्हा तुम्ही त्या लिंकवर क्लिक करून सहभागी होऊ शकता.
- याशिवाय, तुम्ही Google Meet अॅप उघडून, enter a Code or Link किंवा तेथे लिंक या पर्यायावर टॅप करून, दिलेल्या पर्यायावरील लिंक पेस्ट करून तुमची मीटिंग सुरू करू शकता.
- याशिवाय, तुम्ही Google Calendar मध्ये शेड्यूल वर क्लिक करून/टॅप करून Google Calendar वर जाऊ शकता.
- तुमच्या कॉम्प्युटर, लॅपटॉप आणि अँड्रॉइड स्मार्टफोनवर या उल्लेख केलेल्या पद्धती वापरून तुम्ही Google Meet मध्ये तुमची मीटिंग शेड्यूल करू शकता.

## AI ला भीतीने नव्हे, तयारीने सामोरे जा!

**AI म्हणजे मानवासारखी निर्णयक्षमता असलेली बुद्धिमान संगणकीय यंत्रणा. हे तंत्रज्ञान जगभरातील उद्योग, सेवा, शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडवत आहे. परंतु या प्रगतीच्या सोबत एक मोठा प्रश्न उभा आहे 'AI मुळे माणसाच्या नोकऱ्या जातील का?'**



AI आता फक्त रोबोटिक्सपर्यंत मर्यादित राहिलेले नाही. बँकांमध्ये कागदांची तपासणी, दुकानदारासाठी ग्राहकांच्या आवडीनुसार शिफारसी, किंवा कारखान्यांमध्ये स्वयंचलित यंत्रे ही सर्व कामे AI स्वयंचलितपणे पार पाडत आहे. AI ही नोकऱ्यांची संपूर्ण नाश करणारी नसून, नोकऱ्यांचे स्वरूप बदलणारी शक्ती आहे. काही पारंपरिक नोकऱ्या कालबाह्य होतील, पण त्याचवेळी नव्या संधीही उघडतील. त्यामुळे AIला भीतीने नाही, तर तयारीने सामोरे गेले पाहिजे. भविष्यात टिकून राहायचं असेल, तर बदल स्वीकारावा लागेल.

मानवाच्या बुद्धीची नक्कल करणारी, स्वयंचलितपणे शिकणारी आणि निर्णय घेणारी यंत्रणा म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI). पूर्वी विज्ञानकथांमध्ये वाचलेली कल्पना आज प्रत्यक्षात जग बदलणारी शक्ती बनली आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, वाहतूक, आणि अगदी आपल्या रोजच्या जीवनातही AI मोठी भूमिका बजावत आहे. AI म्हणजे अशी संगणकीय प्रणाली किंवा यंत्रणा जी मानवासारखी शिकते, निर्णय घेते, समस्या सोडवते आणि कामे पार पाडते. AI ही 'डेटा'वर आधारित तंत्रज्ञान आहे. यामध्ये मशीनला प्रचंड प्रमाणात माहिती दिली जाते, त्यावर प्रशिक्षण (training) दिले जाते आणि मग ती यंत्रणा विशिष्ट कामासाठी वापरली जाते. AI म्हणजे केवळ संगणक नव्हे, तर ही एक बुद्धिमत्ता आहे जी मानवाला मदतीसाठी विकसित केली आहे. मात्र ती वापरताना योग्य नियम, नैतिकता आणि मर्यादा यांचे भान ठेवणे तितकेच गरजेचे आहे. आजची पिढी ही AI सह जगणारी पिढी आहे, त्यामुळे AI चा समज, जबाबदारी आणि योग्य उपयोग ही काळाची गरज आहे.

### कोणत्या नोकऱ्यांवर धोका?

| क्षेत्र | धोक्यात असलेली नोकरी |
|---|---|
| बँकिंग / अकाउंटिंग | डेटा एन्ट्री, स्टेटमेंट तपासणी |
| ग्राहक सेवा | कॉल सेंटर एजंट्स (Chatbots नी बदलले) |
| वाहतूक | ड्रायव्हर (Self-driving गाड्या) |
| उत्पादन क्षेत्र | मशीन ऑपरेटर, असेंब्ली लाईन वर्कर्स |
| खरेदी-विक्री | कॅशियर, सेल्स असिस्टंट्स (AI POS systems) |

### AI चे प्रकार

- Narrow AI – ठराविक कामासाठी (उदा. सिरी, गूगल असिस्टंट)
- General AI – मानवी बुद्धिमत्तेसारखी सर्वसामान्य कामे करू शकणारी (सध्या विकसित होण्याच्या प्रक्रियेत)
- Super AI – मानवी बुद्धीपेक्षा जास्त प्रगत (भविष्यातील शक्यता)

### कोणत्या क्षेत्रांत नवीन संधी...

| क्षेत्र | उदयास येणाऱ्या नोकऱ्या |
|---|---|
| AI विकास | डेटा सायंटिस्ट, ML इंजिनिअर |
| सायबर सुरक्षा | AI-based सुरक्षा प्रणाली व्यवस्थापक |
| शिक्षण | ऑनलाइन ट्यूटर, कंटेंट क्रिएटर |
| डिजिटल मार्केटिंग | SEO विश्लेषक, ट्रेंड विश्लेषक |
| आरोग्य सेवा | AI सहाय्यक वैद्यकीय निदान, हेल्थ डेटा विश्लेषक |




### AIमुळे नोकऱ्या जातात का?

**हो, कारण...**

- काही साधी, पुनरावृत्तीची कामे आता यंत्रे करतात.
- मोठ्या कंपन्या श्रमबचतीसाठी AIचा वापर करतात.

**नाही, कारण...**

- AI माणसाच्या भावना, सहानुभूती, सर्जनशीलता यांची नक्कल करू शकत नाही.
- अनेक नवीन प्रकारच्या नोकऱ्या निर्माण होत आहेत.
- AI सहाय्यक ठरू शकतो, पर्याय नव्हे.

### भविष्यासाठी तयारी कशी करावी?



- नवीन कौशल्ये आत्मसात करा : कोडिंग, डेटा अॅनालिटिक्स, डिजिटलीकरणाचे ज्ञान.
- AI सह कार्य करण्याची तयारी ठेवा : AI सॉफ्टवेअरसोबत काम कसे करायचे हे शिका.
- उद्योजकता विचार करा : नवीन समस्या, नवीन उपाय, म्हणजे नवीन व्यवसाय

### AI चे उपयोग क्षेत्र

| क्षेत्र | वापराचे स्वरूप |
|---|---|
| शिक्षण | वैयक्तिक शिक्षण, परीक्षा विश्लेषण, स्मार्ट क्लासरूम |
| आरोग्यसेवा | रोगाचे निदान, मेडिकल रिपोर्ट विश्लेषण, व्हर्च्युअल डॉक्टर |
| शेती | हवामान विश्लेषण, पीक सल्ला, ड्रोनद्वारे देखरेख |
| उद्योग व व्यवसाय | रोबोटिक्स, ग्राहक सेवा, डेटा विश्लेषण |
| वाहतूक | सेल्फ ड्रायव्हिंग कार, ट्रॅफिक व्यवस्थापन |
| मनोरंजन | Netflix, YouTube शिफारसी, गेमिंग बुद्धिमत्ता |

### फायदे-तोटे

- फायदे : वेळ व श्रम वाचतो, अचूक निर्णय, मोठ्या प्रमाणात डेटा विश्लेषण शक्य, 24x7 सेवा
- तोटे : नोकऱ्यांवर परिणाम, चुकीच्या निर्णयाचा धोका, गोपनीयतेचा प्रश्न

### भविष्यातील शक्यता

- AI + Robotics = मानवासारखे यंत्रमानव
- AI + Healthcare = कॅन्सरसारख्या आजारांचे सुरुवातीला निदान
- AI + शिक्षण = प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजेनुसार शिकवणारी प्रणाली
- AI + सुरक्षा = चेहरा ओळखणारे कॅमेरे, दहशतवाद प्रतिबंध

## अबब... किती हा इंटरनेट वापर!



**भारतात गेल्या दशकात इंटरनेटचा झपाट्याने विस्तार झाला आहे. स्मार्टफोन आणि स्वस्त डेटा दरांमुळे शहरांपासून ते ग्रामीण भागांपर्यंत डिजिटल क्रांती घडली. इंटरनेट आता केवळ माहिती मिळवण्याचे साधन न राहता शिक्षण, करमणूक, व्यापार, बँकिंग आणि आरोग्यसेवा यांचा आधार ठरले आहे. भारतातील इंटरनेट वापर हा केवळ आकड्यांचा विषय राहिलेला नाही. तो आता जीवनशैलीचा भाग बनला आहे. शिक्षण, करमणूक, व्यवहार आणि आरोग्य या सर्व क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा प्रभाव वाढत आहे. यामुळे येत्या काही वर्षांत भारताचा डिजिटल चेहरा आणखी बदलणार आहे.**

### भारतात किती इंटरनेट युझर्स?

२०२५ सालाच्या सुरुवातीस भारतात ८५० दशलक्ष म्हणजे ८५ कोटींपेक्षा अधिक इंटरनेट वापरकर्ते असल्याचा अंदाज आहे. २०२३ मध्ये हा आकडा सुमारे ७५० दशलक्ष होता. भारत हा चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा इंटरनेट बाजार आहे. ग्रामीण भागात इंटरनेट वापराचे प्रमाण वेगाने वाढत आहे.

### सध्याचा वापर कसा आहे?

- सुमारे ९८ टक्के युझर्स स्मार्टफोनवरून इंटरनेट वापरतात.
- Jio, Airtel यांसारख्या कंपन्यांनी स्वस्त डेटा उपलब्ध करून दिला.

| वयोगट / वर्ग | इंटरनेट वापराचा मुख्य हेतू |
|---|---|
| तरुण (१५-३० वर्षे) | सोशल मीडिया, व्हिडीओ गेमिंग, YouTube, OTT |
| विद्यार्थी | ऑनलाइन शिक्षण, ई-पुस्तके, नोट्स |
| गृहिणी | YouTube, पाककृती, ऑनलाईन खरेदी, धार्मिक व्हिडिओ |
| कामकाजी वर्ग | बँकिंग, UPI, सरकारी सेवा, न्यूज |
| ज्येष्ठ नागरिक | भक्ती गीत, WhatsApp, न्यूज, आरोग्यविषयक माहिती |

### प्रमुख वापर क्षेत्रे

- व्हिडिओ स्ट्रीमिंग: YouTube, Hotstar, Netflix, JioCinema
- सोशल मीडिया: WhatsApp, Facebook, Instagram, Telegram
- ऑनलाइन शिक्षण: Byju's, Unacademy, YouTube Learning
- ऑनलाइन खरेदी: Amazon, Flipkart, Meesho
- फिनटेक आणि बँकिंग : UPI, PhonePe, Google Pay, नेटबँकिंग

**भविष्यातील कल :** वेगवान इंटरनेटमुळे AR/VR, स्मार्ट सिटी, स्मार्ट हेल्थकेअर यांसारख्या सेवा लोकप्रिय होतील. ग्रामीण भागातील युझर्ससाठी हिंदी, मराठी, तमिळ अशा भाषांमध्ये कंटेंट वाढेल. इंटरनेट वापर वैयक्तिकृत होईल. AI आधारित सूचना, चॅटबॉट्स अधिक वापरले जातील.

## मनोरंजन आता ऑनलाइन!

**सध्याच्या डिजिटल युगात इंटरनेटचा प्रसार झपाट्याने झाला आहे. या क्रांतीमुळे मनोरंजनाची परंपरागत साधने मागे पडून ऑनलाइन व्हिडीओ अॅप्स व वेबसाईट्स पुढे आली आहेत. टीव्ही, चित्रपटगृह, केबल यांचे स्थान आता यूट्यूब, नेटफ्लिक्स, अॅमेझॉन प्राइम, हॉटस्टार, झी फाइव्ह आणि इतर व्हिडीओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मनी घेतले आहे. मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप किंवा स्मार्ट टीव्हीवर कुठेही, केव्हाही, आवडती मजकूर पाहण्याची मुभा हीच यांची खासियत आहे.**

### लोकप्रिय अॅप्स व वेबसाईट्स

- YouTube : जगातील सर्वात मोठे व्हिडीओ शेअरिंग प्लॅटफॉर्म. शैक्षणिक, मनोरंजन, न्यूज, संगीत अशा सर्व प्रकारचे व्हिडीओ येथे उपलब्ध असतात.
- Netflix : मूळ वेब सिरीज, चित्रपट आणि डॉक्युमेंटरीसाठी प्रसिद्ध.
- Amazon Prime Video : भारतीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट, वेब सिरीज आणि टीव्ही शोज यांचे विशाल संकलन.
- Disney+ Hotstar : स्टार नेटवर्कवरील शोज, क्रिकेट सामने, हिंदी व मराठी मालिका आणि हॉलिवूड चित्रपट उपलब्ध.
- ZEE5 : झी नेटवर्कचे सर्व प्रादेशिक आणि हिंदी शोज, सिनेमा आणि ओरिजिनल वेब सिरीज यांचा समावेश.
- MX Player : मोफत वेब सिरीज आणि व्हिडीओसाठी लोकप्रिय अॅप, ग्रामीण व युवा वर्गात विशेष लोकप्रिय.

### वैशिष्ट्ये आणि फायदे

इंटरनेट असताना जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात तुमचा आवडता कंटेंट पाहू शकता. वापरकर्त्यांच्या पाहण्याच्या इतिहासानुसार अॅप्स शिफारसी देतात. मराठी, हिंदी, इंग्रजीसह अनेक भाषांमध्ये व्हिडीओ उपलब्ध. अनेक प्लॅटफॉर्म्स ऑफलाइन पाहण्यासाठी डाऊनलोडची सुविधा देतात. आता अनेक अॅप्स स्वतःचे वेब शो, शॉर्ट फिल्म्स तयार करतात.



# आत्मसमर्पित १३ नक्षलवादी युवक-युवती अडकले विवाहबंधनात

## मुख्यमंत्र्यांकडून आशीर्वाद, पोलीस बनले वऱ्हाडी

**गडचिरोली (प्रतिनिधी)** - लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा आणि सुखाचा क्षण असतो. त्यामुळेच, मित्र-परिवार, नातेवाईक, सहकारी सर्वजणांच्या साक्षीने या आनंदाच्या सोहळ्याचे सेलिब्रेशन होत असते. गरिबापासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाच्या जीवनात हा क्षण सदैव आठवणीत राहणारा असतो. मुलगा थोडा वाईट वागत असेल, किंवा जबाबदारीने वागत नसेल तर घरचे म्हणतात, याचं लग्न लावून द्या म्हणजे सुधारेल. मात्र, गडचिरोलीतील नक्षलवादी लग्नाआधीच चांगल्या मार्गावर आले असून त्यांनी आत्मसर्पण केलं आहे. या आत्मसमर्पण केलेल्या १३ नक्षल युवक-युवतींचा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात आणि पोलिसांच्या साक्षीने संपन्न झाला. विशेष म्हणजे गडचिरोली पोलीस मुख्यालयात



चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत येथे शुभ मंगल सावधान म्हणत अक्षता पडल्या.

गडचिरोली पोलीस दलातर्फे आत्मसमर्पित नक्षलवादी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा लग्नसोहळा संपन्न होत आहे. जवळपास १३ आत्मसमर्पित नक्षल युवक युवती या विवाह सोहळ्यातून लग्न बंधनात अडकले आहेत. तत्पूर्वी गडचिरोली पोलीस दलाच्या बँड पथकाद्वारे पोलीस मुख्यालय परिसरातून वर-वधुंची वाजत गाजत वरात काढण्यात आली. या वरातीत पोलीस कर्मचारी वऱ्हाडी बनवून सहभागी झाले होते. विवाह बंधनात अडकणाऱ्या मोस्ट वॉन्टेड नक्षली गिरीधरसह नक्षल युवक-युवतींनी या लग्न सोहळ्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

वर्षानुवर्षे घनदाट जंगलात बंदुकीच्या जोरावर क्रांती घडवू पाहणाऱ्या अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाची वाट धरली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात विकासाची नवीन पहाट उजाडली आहे. गडचिरोली पोलिसांनी या आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची रेशीमगाठ जुळवून आणली असून आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आत्म समर्पित नक्षलवाद्यांचा सामूहिक विवाह सोहळा गडचिरोलीच्या पोलीस मुख्यालयात पार पडला. पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू अलाम सभागृहात हा विवाह सोहळा संपन्न झाला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह गणमान्य नागरिक उपस्थित होते. नव विवाहित नक्षल दांपत्यांना मुख्यमंत्री स्वतः शुभ आशीर्वाद दिले असून विविध साहित्याचे वाटपही यावेळी करण्यात आले.

# जगातील सर्वात उंच रेल्वेपुलावर तिरंगा



**श्रीनगर (प्रतिनिधी)** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात उंच रेल्वेपुलाचे उद्घाटन केले. चिनाब रेल्वे पूल हा जगातील सर्वात उंच रेल्वे पूल आहे. या पुलाचे उद्घाटन केल्यानंतर पंतप्रधान मोदींनी तिरंगा घेऊन पुलावरुन चालत एक फेरी मारली.

अतिरेक्यांची दहशत असताना मागील काही दशके जम्मू काश्मीरमध्ये सार्वजनिक ठिकाणी तिरंगा हाती घेऊन वावरणे अशक्य होते. पण मोदी सरकारच्या नेतृत्वात संसदेने बहुमताने जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवले. यानंतर अतिरेक्यांविरोधात भारताने कठोर पवित्रा घेतला आणि हळू हळू वातावरण बदलण्यास सुरुवात झाली.

शुक्रवार ६ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिनाब रेल्वे पूल या जगातील सर्वात उंच रेल्वे पुलावर तिरंगा हाती घेऊन चालत एक फेरी मारली. पंतप्रधान मोदींनी चिनाब पुलाची पाहणी केली. तसेच पंतप्रधान मोदींनी अंजी पुलाचेही उद्घाटन केले. अंजी पूल हा भारतातील पहिला केबल रेल्वे पूल आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी कटरा-श्रीनगर वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला. कटरा रेल्वे स्थानकावर कटरा-श्रीनगर वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यापूर्वी पंतप्रधानांनी ट्रेनमधील प्रवाशांशी आणि क्रू सदस्यांशी संवाद साधला.

पंतप्रधान मोदी चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाजवळील 'व्ह्यू पॉइंट'वर पोहोचले आणि त्यांना काश्मीरला उर्वरित देशाशी रेल्वेने जोडण्यासाठी महत्त्वाच्या प्रकल्पाची माहिती देण्यात आली.

पंतप्रधानांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, जितेंद्र सिंह आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह प्रतिष्ठित पुलाजवळ उभारलेल्या रेल्वे संग्रहालयाला भेट दिली. 'व्ह्यू पॉइंट' नदीपासून ३५९ मीटर उंचीवर वसलेला अभियांत्रिकी चमत्कार आहे, जो पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच आहे.

# ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया : १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांची नोंदणी

**मुंबई (प्रतिनिधी)** - राज्यामध्ये सन २०२५-२६ पासून उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहेत. या प्रक्रियेत आज अंतिम मुदतीपर्यंत एकूण १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असल्याची माहिती प्र.संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ.श्रीराम पानझाडे यांनी दिली आहे.

या प्रक्रियेसाठी राज्यातील कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक शाळांची पहिल्या फेरीमध्ये ९,४३५ नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता २१,२३,०४० इतकी असून त्यापैकी कॅप फेरीसाठी प्रवेश क्षमता १८,९७,५२६ तर कोटा प्रवेश क्षमता २,२५,५१४ इतकी आहे. यासाठी दिनांक २६ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत https://mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावर विद्यार्थी नोंदणी करण्यात आली.यामध्ये १२१५१९० विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क ऑनलाईन जमा केलेले आहे. १२, ०५,१६२ विद्यार्थ्यानी अर्ज भाग-१ भरलेले आहेत. तर, अर्ज भाग-२ भरुन अंतिम करुन ११,२९,९२४ विद्यार्थ्यांनी लॉक केलेले आहेत. नियमित फेरी साठी ११,२९,९३२ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. इनहाऊस कोटा साठी ६४,२३८ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. व्यवस्थापन (मॅनेटमेंट) कोटासाठी ३२,७२१ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. अल्पसंख्याक (मायनॉरिटी) कोटासाठी ४७,५७८ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत.

# तेलंगणा पोलिसांनी धाड टाकून कोट्यवधी रुपयांची बनावट कृषी रसायने केली जप्त

**चित्तोडगड (प्रतिनिधी)** - तेलंगणा पोलिसांनी राजस्थानमधील चित्तोडगड जिल्ह्यातील बस्सी गावातील एका फार्म हाऊसवर धाड टाकली. धाड टाकून पोलिसांनी राजू चेचानी याला अटक केली. याआधी पोलिसांनी हैदराबादमधील ई राजेशच्या गोदामावर धाड टाकून कोट्यवधी रुपयांची बनावट कृषी रसायने जप्त केली होती. याच प्रकरणात पोलिसांनी राजू चेचानी याला अटक केली. या कारवाईमुळे भारतातील कृषी क्षेत्राला असलेला बनावट कीटकनाशकांचा वाढता धोका उघडकीस आला आहे.

बनावट कीटकनाशके वाजवी दरात विकून शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. एकदम खऱ्या ब्रँडसारखी पॅक केलेली ही बनावट रसायने शेतीसाठी अत्यंत हानिकारक असतात. त्यांच्या वापरामुळे तसेच त्यातील घातक घटकांमुळे अनेकदा पिकांचे नुकसान होते आणि उत्पादनात घट होते. नुकत्याच झालेल्या अटकेमुळे अशा प्रकाराला आळा बसेल अशी आशा व्यक्त होते आहे. अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या बनावट कृषी रसायनांची पुरवठा साखळी तोडण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

चेचानी मागील सात वर्षांपासून अकरा पेक्षा जास्त राज्यांमध्ये त्याच्या सहकाऱ्यांच्या मदतीने बनावट कृषी रसायनांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करत होता, असा आरोप पोलिसांनी त्याच्यावर केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार चेचानी दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक येथे कार्यरत असलेल्या सहकाऱ्यांच्या विस्तृत नेटवर्कद्वारे प्रतिष्ठित कृषी रसायन कंपन्यांचे लेबल लावलेली बनावट उत्पादने शेतकऱ्यांना वाजवी दरात विकत होता. या प्रकरणात पुढील पोलीस कारवाई आणि तपास सुरू आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत महत्त्वपूर्ण बदल

**लातूर (प्रतिनिधी)** - राज्य सरकारने सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी आर्थिक मदत देणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात महत्त्वाचे बदल केले असून, सुधारित शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला. योजनेत सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, ई-वाहतूक, ब्रँड आधारित विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्रे, खाद्यपदार्थ केंद्रे, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल, ढाबा, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा आणि प्रवासी वाहतुकीसाठी बोट व्यवसाय यांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी अनुसूचित जाती-जमातींसाठी ५० वर्षे आणि इतर प्रवर्गासाठी ४५ वर्षे असलेली वयोमर्यादा आता पूर्णपणे हटवण्यात आली आहे. प्रकल्पाची कमाल किंमत सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी २० लाखांवरून ५० लाख रुपये, तर उत्पादन उद्योगांसाठी ५० लाखांवरून १ कोटी रुपये करण्यात आली आहे. कर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी १ आठवडा, तर उत्पादन उद्योगांसाठी २ आठवड्यांचे उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य आहे.

# आयसीआयसी बँकेत ४.५८ कोटींची फसवणूक; महिला मॅनेजरला अटक

**जयपुर (प्रतिनिधी)** - राजस्थानच्या कोटा शहरात आयसीआयसीआय बँकेच्या महिला रिलेशनशिप मॅनेजर साक्षी गुप्ताने तब्बल ४ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. तिने ४१ ग्राहकांच्या ११० हून अधिक खात्यांमधून ही रक्कम अनधिकृतरित्या काढून शेअर बाजारात गुंतवली होती.

आयसीआयसीआय बँकेच्या रिलेशनशिप मॅनेजर असलेल्या साक्षी गुप्ता ही फसवणूक टाळण्यासाठी ग्राहकांचे मोबाईल क्रमांक बदलत होती आणि त्या जागी तिच्या कुटुंबातील सदस्यांचे नंबर नोंदवत होती, जेणेकरून ओटीपी आणि व्यवहारांची माहिती मूळ खातेदारांपर्यंत पोहोचू नये. तिने वैयक्तिक ३ लाख ४० हजारांचे कर्ज मंजूर करून घेतले, तसेच ३१ एफडी वेळेच्या आधीच बंद करून १ कोटी ३४ लाखांहून अधिक रक्कम स्वतःच्या खात्यात वळवली. तिने डिजिटल बँकिंग, इंस्टा किओस्क आणि चार ग्राहकांच्या डेबिट कार्डचा वापर करत व्यवहार केले आहेत.

या प्रकरणाची चौकशी सुरू असताना बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तिच्यावर संशय आला असता. तपासात हे स्पष्ट झाले की, तिने २०२० ते २०२३ दरम्यान ही फसवणूक केली असून, एका प्रकरणात ३ कोटी २२ लाख रुपये एका वरिष्ठ महिला ग्राहकाच्या खात्यातून गायब करण्यात आली होती. साक्षी गुप्ताला ३१ मे रोजी अटक करण्यात आली आहे. तिच्या कुटुंबीयांचेही व्यवहार तपासाच्या केंद्रस्थानी असून, या फसवणुकीत आणखी कोणी सहभागी होते का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

एका ग्राहकाने त्याच्या एफडीबद्दल विचारपूस करण्यासाठी बँकेत आल्यावर हा घोटाळा उघडकीस आला. त्यानंतर बँकेने १८ फेब्रुवारी रोजी पोलिसात गुन्हा दाखल केला. व्यवहाराच्या संदेशांची माहिती त्यांना मिळू नये म्हणून महिलेने खात्यांशी जोडलेल्या ग्राहकांचे मोबाईल नंबरही बदलले. तिने तिच्या कुटुंबातील सदस्यांचे फोन नंबर या खात्यांशी जोडले आणि ४ कोटींहून अधिक रुपये काढले.

खातेधारकांना फसवणुकीची कल्पना येऊ नये म्हणून तिने तिच्या सिस्टमवर ओटीपी मिळवण्यासाठी एक प्रणाली देखील तयार केली, असे तपास अधिकारी इब्राहिम खान म्हणाले. आयसीआयसीआय बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की त्यांनी एफआयआर दाखल केला आहे आणि कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे.

# अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म-२ भरण्यासाठी ७ जूनपर्यंत मुदतवाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** - इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये पहिल्या फेरीसाठी अर्ज भरण्यासाठी २६ मे ते ५ जून २०२५ हा कालावधी विद्यार्थ्यांना देण्यात आला होता. या कालावधीमध्ये दि. ५ जून २०२५ पर्यंत ११,२९,९२४ विद्यार्थ्यांनी आपले फॉर्म पूर्ण भरले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करून प्रवेश अर्जाचा भाग १ लॉक केला आहे तथापि भाग २ अद्याप भरणे बाकी आहे, किंवा लॉक करणे बाकी आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी ७ जून २०२५ दुपारी १२.३० वाजेपर्यंत अर्जाचा भाग २ भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

संबंधित विद्यार्थ्यांनी आपला पसंतीक्रम अर्ज भाग २ दिलेल्या वेळेत लॉक करावा. अशा विद्यार्थ्यांनी भाग २ भरून लॉक न केल्यास त्यांना तात्पुरत्या गुणवत्ता यादीसाठी व पहिल्या फेरीत प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालय देण्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी. यापूर्वी भाग २ लॉक केलेल्या विद्यार्थ्यांना आपले पसंतीक्रम बदलण्याची सुविधा यादरम्यान मिळणार नाही.

ज्या विद्यार्थ्यांनी दि. ५ जून २०२५ पर्यंत ऑनलाइन प्रवेशासाठी नोंदणी केलेली नाही किंवा आपला प्रवेश अर्ज भाग १ भरलेला नाही अथवा प्रवेश अर्ज अर्धवट भरला आहे व विहित मुदतीत आपला अर्जाचा भाग १ पूर्ण करू शकले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक फेरीच्या सुरुवातीला नव्याने प्रवेश अर्जाचा भाग १ व भाग २ भरण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी काळजी करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी पुढील फेरीच्या वेळी आपले अर्ज वेळेत भरून लॉक करावेत. प्रत्येक फेरीपूर्वी नवीन विद्यार्थ्यांनाही आपला अर्ज भरण्याची सुविधा मिळणार आहे.


## पाहिजेत

श्री संत गाडगेबाबा अंपगोद्वार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय, हदगांव ता.हदगांव जि.नांदेड या शासन मान्य अनुदानित शाळेतील सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदावर खालील अर्हताधारक उमेदवाराची नियुक्ती करणे आहे.

| अ.क्र.. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | अनुशेष |
|---|---|---|---|---|
| 1. | विशेष शिक्षक | 01 | बारावी, डी.एस.ई. (एम.आर.) आर.सी.आय.प्रमाणपत्र प्राप्त | इमाव |

वरील पदाकरिता अर्हताधारक उमेदवारांनी दि.10.06.2025 रोजी वेळ सकाळी ठिक 11.00 वाजता शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रासह संस्थेचे कार्यालय श्री संत गाडगेबाबा अपंगोद्वार शिक्षण प्रसारक मंडळ, साई सदन, शारदानगर, नांदेड येथे स्वखर्चाने उपस्थित राहवे.

**सचिव**
**श्री संत गाडगेबाबा अंपगोद्वार शिक्षण प्रसारक मंडळ देगलूर जि.नांदेड मो.७०२०५७५१९२**


# दररोज दोन तास टीव्ही, फोन बंद ठेवणारं धाराशिवमध्ये देशातलं एकमेव गाव

**धाराशिव (प्रतिनिधी)** - उमरगा तालुक्यातील जकेकुरवाडी येथे गेल्या तीन वर्षांपासून गावात मुलांच्या अभ्यासासाठी दोन तास घरातील टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवण्यात येतात. ग्रामपंचायतीचा भोंगा वाजला की, दररोज सायंकाळी सहा ते आठपर्यंत ही साधने बंद राहत असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांनाही झाला आहे.

गेल्या काही वर्षांत संवादाचे माध्यम असलेल्या मोबाईल तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात अमूलाग्र बदल झाला आहे. सध्या घरोघर टीव्ही, मोबाईल, संगणक, लॅपटॉप आदी वस्तू दैनंदिन कामासाठी वापरतात. नवीन पिढी तर या सर्व साधनांची पुरस्कर्ती झाली आहे. सुरुवातीला कुतूहल म्हणून लहान मुलांच्या हातात दिलेला मोबाईल त्यांच्या सवयीचा भाग बनला आहे. गावोगावी टीव्हीवर मालिका, मोबाईलमुळे लहान मुलांच्या अभ्यासावर तसेच इतर दुष्परिणाम होत आहेत. नेमकी हीच बाब लक्षात घेऊन



बावीसशे लोकसंख्या असलेल्या जकेकुरवाडीचे तरुण सरपंच अमर सूर्यवंशी यांनी यावर एक उपाय शोधला. त्यातून विद्यार्थ्यांनाही नवी दिशा मिळाली.

गावात जिल्हा परिषदेची पहिली ते आठवीपर्यंत शाळा आहे. शाळेत दीडशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलांना अभ्यास करता यावा म्हणून गावात टीव्ही आणि मोबाईल दररोज दोन तास बंद करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीला ग्रामस्थांना त्यांनी या निर्णयाचे महत्त्व समजावून सांगितले. मोबाईल, टीव्ही बंद रहावेत म्हणून भोंग्याच्या माध्यमातून आठवण करून दिली जाते. यामुळे गावातील विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागली आहे. तसेच अभ्यासाचे वेळापत्रक तयार झाले असून, गुणवत्तेमध्ये वाढ झाली आहे.

विशेष म्हणजे या निर्णयाचा गावातील इतर नागरिकांचा एकमेकांशी संवाद वाढला असून याचा चांगला फायदा झाला आहे. विद्यार्थी आणि पालकांनी चांगला प्रतिसाद दिला असून, याचे शंभर टक्के पालन होत असल्याचे सरपंच सूर्यवंशी यांनी सांगितले. गावात दररोज संध्याकाळी ठरवलेल्या नियमितपणे टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीवर भोंगा लावण्यात आला आहे. भोंग्याचा आवाज कानावर पडताच घराघरातील टीव्ही, मोबाईल बंद होतो. सर्व मुले घरी जाऊन अभ्यासाला बसतात. गावात निरव शांतता राखली जाते. हा उपक्रम गेल्या तीन वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. आदर्श गाव जकेकुरवाडीमध्ये विविध उपक्रम राबवले जात आहेत.

याच अनुषंगाने गावाला आदर्श बनवण्यासाठी व महाराष्ट्रामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये स्थान मिळवण्यासाठी गेल्या चार वर्षापासून विविध उपक्रम गावात होत आहेत. भूमी अंतर्गत गटार असो, ११०० नारळाची झाडे लावणे, संध्याकाळी सहा ते आठ मोबाईल टीव्ही बंद, दररोज सकाळी राष्ट्रगीताने सुरुवात या नियमानुसार आता जकेकुरवाडी गावाचे सरपंच अमर सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण गावातील घरांना ग्रामपंचायत कार्यालयामार्फत मोफत रंगकाम केले जात आहे.


## टी.सी.हरवली

माझी श्रीजा राजू चव्हाण या नावाची भारती (स्वतंत्र) उच्च माध्यमिक विद्यालय हदगाव येथून काढलेली बारावी उत्तीर्ण टीसी व आधार कार्ड आणि इतर काही कागदपत्रासह बस प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.- **संपर्क पत्ता-राजू भिमराव चव्हाण मु. पो. गोर्लेगाव ता. हदगाव जिल्हा नांदेड मो क्र : ९१७२९१९८४०**








## जाहीर प्रगटन

एक्सपीय नियम, २००८ चे कलम १०३ (३) (अ) नुसार)

विषय नियोजित गट क्रं. ३३२ मौजे भोसी ता. भोकर जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ). हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांचे पत्र HPCL-SOLPUR/BHOGI/NOC, दिनांक २५-०४-२०२४

मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ), हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांनी मौजे भोसी, ता. भोकर जि. नांदेड येथील गट क्रं. ३३२ मध्ये नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी कंपनीने श्री. अजय नारायणराव सायाळकर रा. भंडारी नगर, नांदेड यांना डिलरशिप दिलेली आहे.

सदरील पेट्रोलपंप उभारायचा भुखंड ( गट क्रं. ३३२ मौजे भोसी ता.भोकर जि.नांदेड हा श्री. अजय नारायणराव सायाळकर यांच्या मालकीचा आहे. सदर जमिनीचे एकूण क्षेत्र ७४ आर इतके आहे. त्यापैकी ते १९ आर, ५० चौ.मी. इतकी जमीन नवीन पेट्रोलपंप / रिटेल आऊटलेट उभारण्यासाठी वापरणार आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित जागेत हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, सोलापूर यांना नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसाचे आत लेखी आक्षेप/हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर करावयात मूदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

मूदतीत प्राप्त आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतीम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

**अपर जिल्हादंडाधिकारी,नांदेड**



## जाहीर प्रगटन

सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, ना.वा.श.म.न.पा. हद्दीतील बाबानगर नगर पालीका कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म. नांदेड मधील संस्थेच्या मालकीच्या सि.टी. सर्व्हे नं. ६२८२ पैकी प्लॉट क्र. ११ (ब) ज्याची लांबी : पुर्व-पश्चिम : ६० फूट म्हणजे १८.२९. मी. व रुंदी : दक्षिण-उत्तर ४० फूट म्हणजे १२.१९ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौरस फूट म्हणजेच २२३.०४ चौरस मीटर आहे. ज्याच्या चतु:सिमा - पुर्वेस : प्लॉट क्र. १७ (ब) पश्चिमेस : सरकारी रस्ता दक्षिणेस : प्लॉट क्र. १२ (ब) व उत्तरेस : संस्थेची जागा येणेप्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉट क्र. ११ (ब) हा संस्थेने संस्थेचे सभासद श्री. राजेश पि. अशोककुमार पाहुजा व श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांना रजिस्टर्ड कन्व्हेन्सडीड अधारे संयुक्त वाटप केलेला असून त्याबाबत संस्थेने त्यांना प्लॉट वाटप प्रमाणपत्र सुध्दा दिलेले आहे.

हे की, प्लॉट धारक श्री. राजेश पि. अशोककुमार पाहुजा व श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल या दोघांपैकी श्री. राजेश पि. अशोककुमार पाहुजा यांनी वर नमुद प्लॉट ११ (ब) मधील त्यांच्या अविभाजित अर्ध्याभागावरील (५०% हिस्सा) त्यांचा मालकी हक्क हा रजिस्टर्ड हक्कसोडपत्र क्र. ३५७४/२०२५ दि.११/०४/२०२५ अधारे कायमचे श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांच्या हक्कात सोडून दिला आहे असे श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांनी संस्थेकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. वर नमुद हक्कसोडपत्राव्दारे झालेले हस्तांतरण हे संस्थेच्या संमतीविना झाले आहे. त्यामुळे सदरील हस्तांतरणाची नोद संस्थेकडे झालेली नाही. परंतु आता श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांनी संस्थेकडे विहीत नमुन्यातील इतर आवश्यक ती कागदपत्र सादर करून वर नमुद प्लॉट ११ (ब) चे प्लॉट वाटप प्रमाण पत्र त्यांच्या एकटयाच्या नावाने देण्याबाबत विनंती केली आहे.

तरी श्री. राजेश पि. अशोककुमार पाहुजा व श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांच्या संयुक्त नावाने असलेला सि.टी. सव्र्हे नं. ६२८२ पैकी प्लॉट क्र. ११ (ब) हा श्री. संजयकुमार पि. सुरजलाल जयस्वाल यांच्या एकटयाच्या नावाने हस्तांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा ऊजर असल्यास अथवा सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत संबंधितांनी आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या बाबानगर कार्यालयात लिखित स्वरुपात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**अध्यक्ष/ सचिव**
**बाबानगर नगरपालिका कर्मचारी**
**सह.गृहनिर्माण संस्था.म.नांदेड**

**मार्फत**
**ॲड.अरूण अप्पासाहेब मोरे**
**११६ लक्ष्मीनारायणनगर**
**नांदेड**

**स्थलांतर**
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# यंदाही बकरी ईद हर्षोल्हासात व शांततेत साजरी करा

## मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक आणि धर्मगुरुंसोबत पोलीस अधीक्षकांची बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** बकरी ईद-२०२५ अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्याकरीता नांदेड शहरातील मुस्लिम प्रतिष्ठीत नागरीक, ईदगाह मस्जिद कमिटीचे पदाधिकारी, प्रमुख धर्मगुरु (मौलाना) तसेच खाटीक समाज यांच्या सोबत दि. ४ जून रोजी दुपारी तीनच्या दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयातील मंथन हॉलमध्ये बैठक घेतली.



या बैठकीत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व शहरातील ठाणे प्रभारी अधिकारी तसेच मनापाचे उपायुक्त अजितपालसिंग संधु, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी घुले व विविध खात्याचे अधिकारी यांच्यासह शहरातील मुस्लिम प्रतिष्ठीत नागरीक, धर्मगुरु, सामाजीक कार्यकर्ते व खाटीक समाजाचे प्रमुख नागरीक उपस्थित होते.

या बैठकीत नांदेड शहरातील उपस्थित मुस्लिम प्रतिष्ठीत नागरीक, खाटीक समाज तसेच ईदगाह मस्जिद कमिटीचे पदाधिकारी व प्रमुख धर्मगुरु (मौलाना) यांनी त्यांच्या समस्या मांडल्या. यावर संबंधीत अधिकाऱ्यांकडून तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच ईदच्या दिवशी कोणत्याही गोवंशाची कत्तल करण्यात येणार नाही. कुर्बानी ही बकरा- बकरी, म्हैस- रेडा व मेंढा- मेंढी इत्यादीचे द्यावी, असे मुस्लिम धर्म गुरु यांच्याकडून सर्व मुस्लिम समाजाला आवाहन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

सद्या महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्या लागु आहे. त्यामुळे बकरी ईदनिमित्त गोवंशाची कुर्बानी होणार नाही, याकरीता महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना, परीपत्रक निर्गमीत केले आहे. ईदच्या दिवशी कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. केवळ कायदेशीर मान्यता असलेल्या प्राण्यांचीच कुर्बाणी द्यावी. कुर्बाणी वाटप करतांना योग्य ती काळजी घेण्यात यावी, जेणेकरुन वाद निर्माण होणार नाही. कोणीही कायद्याचे उल्लंघन करणार नाही, कायदा मोडणाऱ्यावर कडक करवाई करण्यात येईल, असे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.

कायदा व सुव्यवस्था व सामाजिक सलोखा अबाधीत ठेवावा. सोशल मिडीयावर कोणतीही आक्षेपार्ह पोस्ट टाकू नये. अफवा पसरवणाऱ्यांवर सायबर सेलचे बारकाईने लक्ष असून संबंधीतावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. समाजातील विशेषतः तरुण वर्गाकडून सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणार नाही, याबाबत ज्येष्ठ नगरीकांनी काळजी घ्यावी. तसेच कोणतीही क्षुल्लक घटना घडल्यास कायदा हातात न घेता, तात्काळ डायल ११२ वर कॉल करावा किंवा नजीकच्या पोलीस स्टेशन येथे संर्पक करावा.

नांदेड शहरातील जनता व पोलीस यांच्यात समन्वय चांगला असल्याने मागील पाच वर्षात बकरी ईद सणा दरम्यान कोणताही गुन्हा दाखल नाही तसेच कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. यावर्षीही आपण सामाजिक सलोख्याची परंपरा कायम ठेवुन उत्साहात बकरी ईद साजरी करा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

# लोहगांव, तळणी परिसराला वादळासह पावसाचा तडाखा

- अनेक झाडे उन्मळून रस्त्यावर पडली
- रामतीर्थ पोलिसांच्या समय सूचकतेने अनर्थ टळला



**नायगांव बाजार (प्रतिनिधी) –** नरसी-बिलोली रोडवरील लोहगाव ते तळणी रोडवर शुक्रवारी (दि.६) सायंकाळी ६ वाजता अचानकपणे वादळी वारे, अवकाळी पाऊस झाला. यात मोठमोठी झाडे अक्षरशः रोडवर उन्मळून पडली. याची माहिती मिळताच रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी फौज फाटा घेऊन रस्त्यावरील झाडे स्वतः बाजूला केली. या समयसुचकतेमुळे रात्रीला होणारे मोठे अपघात टळले आहेत.

बिलोली तालुक्यातील लोहगाव ते तळणी रोडवर शुक्रवारी (दि. ६ जून) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अचानकपणे जोरदार वादळी वारे वाहू लागले. त्यानंतर जोराचा पाऊस झाला. यात मोठमोठी लिंबाची झाडे, बाबळीची झाडे, रोडवर पडली होती. नांदेड - हैदराबाद राज्य महामार्गावरील वाहतुकीला थोडा अडथळाही झाला होता. याची माहिती मिळताच रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सि. जे. सोनकांबळे, संजय शिंदे, रुद्रावाड, धुताडे व लोहगाव येथील सरपंच प्रतिनिधी यादवराव कोरनुळे यांना सोबत घेतले आणि ती झाडे जेसीबीच्या सहाय्याने व रामतीर्थ पोलीसांनी स्वतः बाजूला सारली. रात्रीला मोटारसायकल, चारचाकी वाहनांचा होणारा मोठा अपघात टळला असल्याने रामतीर्थ पोलीसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.





**नांदेड** : आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात शिवराज्यभिषेक दिन सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करण्यात आले. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, प्रल्हाद उमाटे, युवक जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, उदय चव्हाण, रोहिणी कुलकर्णी, सुनंदा जोगदंड आदी पदाधिकारी, कार्यकर्ते दिसत आहेत. दुसऱ्या छायाचित्रात भाजप महानगरच्यावतीने विश्व पर्यावरण दिनानिमित्त नाना-नानी पार्क येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, प्रविण साले, सतिष सामते, मिलिंद देशुमुख, दत्ता पाटील कोकाटे, दिलीपसिंघ सोडी, शितल खांडील, मोहनसिंह तौर, विजय गंभीरे, नागनाथ गड्डम, सुमित मुथा, दुष्यंत सोनाळे, राजू काळे, उदय देशमुख, ज्योती कल्याणकर आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

### वीज कोसळून बैलाचा मृत्यू

शुक्रवारी सायंकाळी नायगांव तालुक्यातील अनेक भागात वीजेचा प्रचंड कडकडाट होवून वादळी वाऱ्याने थैमान घातले. याच दरम्यान टाकळी बु येथील भास्कर नीलकंठ भेलोंडे यांच्या बैलावर वीज कोसळून बैलाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

# आरोपीने पोलीस वाहनातील वायरलेसचे वायर तोडले; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** गोंधळ घालण्यावर लगाम लावणाऱ्या पोलिसांसोबत हुज्जत घातल्याने आरोपीला पोलीस वाहनात बसविले. पण त्या वाहनातील वायरलेसचे वायर तोडल्याचा प्रकार ४ जून रोजी रात्री घडला. याप्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पावडे मंगल कार्यालयाजवळ ४ जून रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास यातील आरोपी अभिजित रेवाले व सुनिल पोहरे हे दोघे दारू पिऊन पावडे मंगल कार्यालयाजवळ ईतर व्यक्तींसमोर गोंधळ घालत होते. यावेळी पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या स्ट्रीट सेफ्टी पथकाचे पोउपनि खंडू दर्शने व त्यांचे कर्मचाऱ्यांनी तुम्ही गोंधळ का घालता असे विचारले असता आरोपींनी पोलीस कर्मचारी जोगपेठे यांची कॉलर पकडली. यावेळी पोलिसांनी त्यास शासकीय वाहनात बसविले असता आरोपीने पोउपनि दर्शने यांच्यासोबत धक्काबुक्की करून वाहनातील वायरलेसचे वायर तोडून नुकसान केले. याप्रकरणी पोउपनि खंडू दर्शने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त येथील श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिना कार्यक्रम घेण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्हिडिओ संदेशाद्वारे ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.



राज्याभिषेक सोहळयाचे औचित्य साधून श्री गुरूगोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थी, माजी विद्यार्थी, स्थानिक उद्योजक यांच्या सहभागातून नाविन्यता प्रदर्शन व पंच परिवर्तन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

नांदेड येथील या सोहळयास प्रमुख पाहूणे म्हणून अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. संजय तुंगार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी आयएमसी सदस्य आयटीआय नांदेडचे हर्षदभाई शहा होते. प्रा. डॉ. नागेश कल्याणकर व प्रा. प्रभाकर जाधव प्रमुख वक्ते म्हणून तर आयएमसीचे सदस्य अभिजीत रेणापूरकर, अरुणजी फाजगे, प्रेमानंद शिंदे, धीरज बिडवे, उपअभियंता काकडे, पदमजा मोटर्सचे शशिकांत वाडेवाले यांची उपस्थिती होती.

एस. एम. राका यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डी. ए. पोतदार यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# दरोडा आणि इतर गंभीर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध मोक्का; शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व परिसरात दरोडा, खुनाचा प्रयत्न आदी गंभीर गुन्ह्यात सतत सक्रिय असणाऱ्या सहा जणाविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे. यातील तीन आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांना निरीक्षणगृहात पाठवले आहे. ही कारवाई प्रभारी ठाणेदार शिवाजी गुरमे यांनी केली.

जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, चझऊ अंतर्गत सन २०२४ मध्ये एकुण १३ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. सन २०२५ या वर्षामध्ये दहा (१०) सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४- २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकुण ८७ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे एकुण १० गुन्हेगारांना हद्द्पार करण्यात आले आहे. कायद्याचा आदर करणारे शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची बारकाईने नजर असून अशा गुन्हेगारांची २+ स्किम अंतर्गत यादी बनवुन गुन्हेगारांवर मोठ्या प्रमाणे कलम ५५,५६ मपोका प्रमाणे हद्दपार, मोक्का, एमपीडी तसेच स्थानबध्द सारखी कठोर प्रतिबंधात्मक काारवाई नांदेड पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# राखीव निधी दिव्यांग बांधवांसाठीच खर्च करावा

## विभागीय आयुक्त यांचे नगरपंचायत, नगरपालिकांना आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** राखीव पाच टक्के निधी खर्च करत नसल्यामुळे दिव्यांगांची उन्नती होत नसल्याची तक्रार सामाजि कार्यकर्ते राहुल साळवे यांनी केली होती. त्यानंतर दिव्यांगासाठीचा राखीव पाच टक्के निधी त्यांच्यासाठीच खर्च करावा. अन्यथा कडक कारवाई करण्याचा इशारा विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी जिल्ह्यातील नगरपंचायत, नगरपालिकांना दिला आहे.

शासन स्तरावरून दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी व वैयक्तीक लाभाच्या योजना असून त्या दिव्यांगापर्यंत पोहोचविण्यासाठी नगर विकास विभागाकडून विविध शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु ह्या योजना २०१० पासून कुठल्याच प्रकारे नगरपरिषद, नगरपालिका,नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांनी दिव्यांगांचा राखीव निधी खर्च केलेला नाही. त्यामुळे दिव्यांगांवर उपासमारीची वेळ आली.

बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आपले सरकार पोर्टलवर राज्य शासनाकडे व विभागीय आयुक्ताकडे तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन विभागीय आयुक्त यांनी त्वरित संबंधित विभागाला आदेश दिले असून दिव्यांगांचा निधी वेळेत खर्च करा अन्यथा कारवाईला सामोरे जा असा इशारा विभागीय आयुक्तांनी संबंधित विभागाला पत्राद्वारे दिला आहे.

या आदेशावरून जिल्हाधिकारी यांनी संबंधित नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत की २०१० पासून चा दिव्यांगांचा निधी त्वरित खर्च करावा अन्यथा आपल्यावर कारवाई करण्यात येईल, असे पत्र संबंधित जिल्हाधिकारी यांनी नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

राहुल साळवे यांनी राज्य शासनाकडे व विभागीय आयुक्ताकडे तक्रार केल्याच्या नंतरच प्रशासनाला जाग आली आहे. वेळेत दिव्यांगांचा निधी खर्च करावा व तक्रारींची दखल घ्यावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी आपल्या तक्रारीमध्ये दिला आहे.

# लोह्यात शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन

**लोहा (प्रतिनिधी)–** उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्यावतीने 'फडणवीस सरकार... क्या हुआ तेरा वादा' आंदोलन केले. त्यानंतर तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



राज्यात महायुती सरकारने जनतेला भूलथापा देऊन सत्ता मिळविली. निवडणूक संपताच दिलेल्या आश्वासनाकडे पाठ फिरवली. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, लाडक्या बहिणींसह सामान्य जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असल्याची टीका शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर सावंत यांनी केली.

सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना लगोलग कर्जमाफी देण्याचा गाजावाजा केला. पण नियमीत कर्ज फेडणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदान नाही. सोयाबीन आणि कापसाचे भाव पाडण्यासाठी परदेशातून हे पीक आयात करण्याचे फतवे काढले जात आहेत. शेतकरी सन्मान योजनेची रक्कम १२ हजारांवरून १५ हजार रुपये करण्याचे आश्वासन हवेत विरले. शेतमालासाठी शीतगृहे कधी उभारणार. हमीभावाची 'दीडपट' भूलथाप ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी आहे.

'एक रुपयात पीकविमा' योजनेची घोषणा करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली. शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई सोडाच, साधे पंचनामेही झालेले नाहीत. ४५ हजार गावांमध्ये पाणंद रस्ते देण्याची घोषणा केवळ कागदावरच राहिली. शेतकऱ्यांचे हाल अजूनही तसेच आहेत, कारण आश्वासनांची पूर्तता कधी होणार, असा प्रश्नही शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर सावंत यांनी विचारला आहे.

यावेळी शिवसेना शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, युवासेनेचे लोहा - कंधार विधानसभा प्रमुख बालाजी गाडेकर, जेष्ठ शिवसैनिक बापुराव पाटील अटकोरे, प्रल्हाद कदम, अंगद उमरेकर, यांच्यासहित मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com